पुणे, किशोर–वर्ष ५५, अंक २ रा, फेब्रुवारी २०२६ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.55, Issue 2, February, 2026 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

फेब्रुवारी २०२६




माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा

# मनात स्मरतो सदैव आम्ही शिवरायांची मूर्ती

आनंद घोडके

मनात स्मरतो सदैव, आम्ही शिवरायांची मूर्ती
घेऊन हाती भगवा त्यांची, गातो महान कीर्ती

शिवनेरीवर सूर्य जन्मला, घेऊन मशाल हाती
धार लागता चमकून गेली, तलवारीची पाती
गंज मनाचे उडून गेले, नवी उगवली नीती
जागी झाली रयत मराठी, सोबत घेऊन राती

कैक सोबती घेऊन, शिवबा रायरेश्वरी गेले
साक्ष ठेवूनी भगवंताला, स्वराज्य घोषित केले
समशेरेला स्पर्श करोनी चुंबिली पावन माती
स्वराज्य तोरण बांधून त्यांनी, केली नवीन क्रांती

गनिमाहूनी स्वकीय धूर्त, नाही हटले मागे
साम, दाम अन् दंड देऊनी, करून सोडले जागे
समानतेचा लावून झेंडा, भेदून गेली जाती
मानवता हा धर्म मानूनी, जोडली नवीन नाती

सह्याद्रीच्या वीरपुत्रांनी धूळ दावले गुरमा
कितीक गेले यमसदनाला त्या गनिमांचे सुरमा
येसा, ताना, मुरार–बाजी, फौज वीरांची होती
त्या शौर्याची गाथा अजुनी, गडकिल्ले हो गाती

तया लाभली धन्य जिजाऊ, जगवंदनीय माता
या विश्वाचा सूर्य खरोखर, जगताचा हा दाता
अभिमानाने चला राखूया, गिरीदुर्गांची ख्याती
सदा पेटवू मराठमोळ्या, शिवप्रेमाच्या वाती

संपर्क : ७३९७८९३२३६



फेब्रुवारी २०२६, वर्ष ५५ वे, अंक २ रा, माघ-फाल्गुन, शके १९४७

किशोर

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| मनात स्मरतो सदैव आम्ही शिवरायांची मूर्ती | आनंद घोडके | २ |
| मुक्ताला मिळालं बक्षीस | वर्षा गजेंद्रगडकर | ६ |
| माझी मराठी | किरण भावसार | ९ |
| म्हणोनी म्हणी | रवींद्र जंगम | १० |
| पिल्लू | दासू वैद्य | १२ |
| चला चित्र रंगवूया | रेश्मा बर्वे | १७ |
| रागीट रिंकू | डॉ. नंदू मुलमुले | १८ |
| आज काय झालं? | कार्टुनिस्ट इरा | २१ |
| नामदेवांची अभंगवाणी | डॉ. संगीता बर्वे | २२ |
| **अभिजात मराठी विभाग** | | |
| कविश्रेष्ठ कुसुमाग्रज | प्रवीण दवणे | २६ |
| अर्थ शोधण्यासाठी मित्र | डॉ. नीलिमा गुंडी | २९ |
| गंमत शब्दांची | प्रा.विश्वास वसेकर | ३१ |
| प्रश्नमंजुषा | डॉ. सुधीर मोरे | ३२ |
| सुधारक संत सेवालाल महाराज | प्रा.गजानन सोनोने | ३३ |
| नकाशातील चिन्हे | प्रा. जी. एन. हंचे | ३६ |
| **बालविभाग** | | |
| कुतूहल | योगेश दराडे | ३८ |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा : जादूगाराची सुटका | घनश्याम देशमुख | ४४ |
| विरामचिन्हे | आकाश भोरडे | ४६ |
| **ENGLISH SECTION** | | |
| The Joy of Spring | Ananya Gavali | ४७ |
| Why Should We Study? | Namdev Revanwar | ४८ |
| Funny Puzzle | Ghanashyam Deshmukh | ५० |



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

- **संपादक :**
अनुराधा ओक, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

- **प्रकाशक :**
हेमंत बाबर
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

- **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

- **निर्मिती अधिकारी :**
मनिष निघोट

- **वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे

- **मुखपृष्ठ :**
अच्युत पालव ※ संपर्क : ९८२११६३१४१

- **चित्रांकन :**
गिरीश सहस्रबुद्धे, घनश्याम देशमुख,
रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते,
लोकेश कुलकर्णी, राहुल पोतदार,
कार्टुनिस्ट इरा, माईंडईट संवाद

- **अक्षरजुळणी :** किशोर विभाग

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

- **ऑनलाईन वर्गणीकरिता :**
www.kishor.ebalbharati.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
**कार्यकारी संपादक, किशोर,**
**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती**
**व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादकीय : ०२०- २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर



मला 'किशोर' मासिक खूप आवडते कारण 'किशोर'मध्ये कथा, कविता, विनोद अशा वेगवेगळ्या गोष्टी असतात. भावी आधारस्तंभामध्ये माझा अनुभवसुद्धा प्रकाशित झाला आहे. मी दर महिन्याचे 'कुतूहल' सोडवते. त्यामुळे माझे सामान्य ज्ञान वाढते. 'किशोर'मधील 'नातं' कविता ही मला फार आवडली. आमच्या घरी आम्ही सर्व जण 'किशोर' वाचतो. आमच्या कॉलनीत माझ्या मित्रमैत्रिणींचा वाढदिवस असल्यावर आम्ही त्यांना भेट म्हणून 'किशोर' मासिक देतो. आधी बाबांनी फक्त घरासाठीच 'किशोर' मासिक लावले होते, पण 'किशोर' आम्हांला आणि बाबांना इतके आवडले की त्यांनी त्यांच्या संस्थेसाठी सुद्धा ते चालू केले. माझ्या बाबांची एक सामाजिक संस्था आहे. ही संस्था मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करते. परभणी जिल्ह्यातल्या १०० उत्कृष्ट बालवाचकांना ते 'किशोर' मासिक भेट देतात. माझे बाबा 'वाचन पेटीमध्ये' सुद्धा 'किशोर' मासिक ठेवतात.

तुम्ही विचार करा, ज्या पद्धतीने माझे बाबा खूप ठिकाणी 'किशोर'चे वाटप करतात. तर खरंच 'किशोर' मासिक किती छान असेल! 'किशोर' मासिकामुळे माझा शब्दसाठा वाढला आहे व मी माझे मनोगत व्यक्त करायला शिकले आहे. तुम्हीपण किशोरचा आनंद घ्या. मला 'धाडस' ही कथा आवडली. शेवटी इतकंच सांगू इच्छिते की, 'किशोर' वाचनामुळे माझा सर्वांगीण विकास व्हायला मदत होत आहे.

**कु. शर्वरी पवन चांडक**
इयत्ता - चौथी,
बाल विद्या मंदिर, वैभव नगर, परभणी
श्रद्धा, विष्णू नगर, वसमत रोड,
परभणी ४३१४०१



हितगुज

# मराठी बोलावी, ऐकावी, वाचावी, लिहावी

किशोर मित्र – मैत्रिणींनो, जरा विचार करून सांगा जर माणसाला भाषाच नसती; ती बोलताच आली नसती तर काय झालं असतं? प्राणी आणि आपण यांच्यात नेमका काय फरक असता? पहा.. तुम्ही जरा विचार करून पहा. निसर्गात माणूस सर्वांपेक्षा वेगळा आहे कारण माणसाकडे स्वतःची भाषा आहे. अग्नी, चाक यांच्याप्रमाणेच माणसाने भाषेचा शोध लावला आणि त्याची प्रगती वेगाने सुरू झाली. तो व्यक्त व्हायला लागला. आपल्या भाषेतून माणूस संपूर्ण जग जाणायला लागला. आपण काय शिकलो ते संपूर्ण जगाला सांगायला लागला आणि त्याच वेळी अनेक गोष्टी जगाकडून आपल्या भाषेत शिकू लागला. लहान मूलच बघा ना! आईचे शब्द त्याच्या कानावर पडतात आणि हळूहळू त्याला जगाची ओळख व्हायची सुरुवात होते. त्यामुळे एखाद्या मुलाचा जन्म जसा त्याच्या घरात होतो, कुटुंबात, गावात, शहरात होतो तसाच त्या मुलाचा जन्म त्याच्या भाषेत होतो. तुमचा जन्म कुठे झाला असं आपल्याला जर विचारलं तर, आपण आपल्या गावाचं, कुटुंबाचं नाव सांगतो. हे बरोबरचं आहे... पण हेही तितकचं खरं आहे की, आपला जन्म एका भाषेत होतो; आपल्या मातृभाषेत होतो.

किशोर मित्र – मैत्रिणींनो, फेब्रुवारी महिना आपल्यासाठी विशेष आहे कारण याच महिन्यात ‘मराठी भाषा गौरव दिवस, आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस, छत्रपती शिवाजी महाराज जयंती’ असे आपल्या मराठी भाषक संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या मानबिंदूंचा समावेश आहे. आजघडीला संपूर्ण जगामध्ये सुमारे ६००० भाषा अस्तित्वात आहेत, असं आपण गृहीत धरू शकतो. या भाषा बोलणाऱ्या व्यक्तींच्या संख्येच्या तुलनेमध्ये, क्रमवारीमध्ये आपली मराठी भाषा ही पहिल्या पंचवीस भाषांमध्ये येते. म्हणजेच सुमारे ६००० भाषांच्यापैकी सगळ्यात ताकदवान भाषांमध्ये मराठी भाषेचा समावेश होतो. ही आपल्यासाठी मोलाची, अभिमानाची बाब आहे.

एखादी भाषा, तिचे शब्द कसे तयार होतात याबाबतचा एक प्रसंग या निमित्ताने आठवला तो तुम्हांला सांगतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात लोकमान्य टिळकांची एक सभा मंडईसमोर झाली होती. या सभेत बोलताना इंग्रज सरकारवर तोफ डागताना टिळक म्हणाले होते की, ‘ही जी ब्यूरॉक्रसी आहे, ती...’ आणि पुढे एक क्षण ते बोलायचे थांबले. आपण बोलताना जो ‘ब्यूरॉक्रसी’ हा इंग्रजी शब्द वापरला तो आपल्या मराठी भाषकांसाठी आणि भाषेसाठी योग्य नाही असे त्यांना मनोमन जाणवले आणि तत्परतेने त्यांनी ‘ही जी नोकरशाही आहे, तिला धडा शिकवायला हवा’ असे म्हटले. त्यानंतर काही वेळाने सभा समाप्त झाली आणि लोकमान्य जेव्हा ‘केसरी’च्या कार्यालयात आले तेव्हा त्यांनी त्यांचे सहकारी काकासाहेब खाडिलकरांना ‘आज काय गंमत झाली’, असे सांगून आपल्याला बोलता बोलता सुचलेल्या शब्दाची गंमत सांगितली. लोकमान्यांना एखादा नवीन मराठी शब्द सुचला तर त्यातून एखाद्या संशोधकाला जसा नवा शोध लागल्यावर आनंद होतो, तसाच आनंद त्यांना अशा विविध नव्या शब्दांच्या वापरातून मिळत असे. लोकमान्य टिळकांनी मराठी भाषेत आणलेल्या विविध नव्या शब्दांची सूची ‘केसरी’ वर्तमानपत्राच्या कार्यालयात आजही उपलब्ध आहे. तुम्ही ती जरूर वाचा.

थ म

किरण केंद्रे
कार्यकारी संपादक

# मुक्ताला मिळालं बक्षीस

वर्षा गजेंद्रगडकर

नेहमीसारखी मुक्ता शाळेतून घरी आली ती मजेत गाणं गुणगुणत. आता ती आठवीत होती, पण अगदी लहान असल्यापासूनच एकटी असली की ती कायम काहीतरी गुणगुणायची. ''काय गातेयस गं तू?'' असं कुणी विचारलं की म्हणायची, ''मला पक्ष्यांनी शिकवलेलं गाणं आहे. तुम्हांला नाही समजणार. मला येते त्यांची भाषा.''

घराजवळ आली तेव्हा मुक्ताला तिच्या घराशेजारच्या मोकळ्या जागेत चार-सहा जण दिसले. सोसायटीच्या बागेसाठीची राखीव जागा होती ती. तिथे आज मोठा टेप लावून काही तरी मोजमापं घेणं चालू होतं. ते पाहून मुक्ता उगाच थोडी अस्वस्थ झाली. पटकन आत जाऊन तिनं दफ्तर टाकलं. खिडकीतून परत एकदा त्या लोकांकडे नजर टाकली. मग ती आईकडे धावली. मागच्या पडवीत आई पुस्तक वाचत बसली होती.



मुक्तानं धावत जाऊन आईला विचारलं, ''अगं, शेजारी कोण लोक आलेत, बघितलंस का? कशासाठी आलेत?''

''अगं, मीपण बघितलं. जवळपास तास होऊन गेला; बरीच चर्चा, सर्व्हे चालू आहे त्यांचा. ... चल, तू कपडे बदल आणि हात-पाय धुऊन घे. पोळीचा लाडू करून ठेवलाय मी तुझ्यासाठी. तो खाऊन घे. भूक लागली असेल ना?'' आई म्हणाली.

''पण तू आधी सांग, ते लोक कशासाठी आलेत? विचारलं नाहीस का तू?'' मुक्ताला भुकेपेक्षा आज ही वेगळीच चिंता सतावत होती.

''इथे म्हणे बागेऐवजी मोठा बॅडमिंटन हॉल होणारे. आणि जिमसुद्धा.'' आई म्हणाली. ''मगाशी या लोकांसोबत आपल्या सोसायटीचे अध्यक्ष काळे काकाही होते इथे. ते सांगत होते. आणि बाबाही म्हणाले, परवा मीटिंगमध्ये ठरलंय म्हणून.''

''पण असं कसं करू शकतात ते?'' मुक्ता उसळून म्हणाली. ''बागेच्या जागेवर बागच व्हायला हवी.''

मुक्ताच्या घरालगतच्या या मोकळ्या जागेत अजून बाग झाली नव्हती, त्यामुळे ते छोटं कुरणच होतं. शिवाय चार-सहा मोठी झाडंही होती तिथे. तिच्या घराच्या बाजूला एक वडाचं आणि एक पांढऱ्या चाफ्याचं झाड होतं. ती झोपायची, अभ्यास करायची, त्या खोलीतून ही दोन्ही झाडं दिसायची. चैत्र-वैशाखात चाफ्याच्या झाडावर फुलपाखरं रेंगाळत असायची. फुलचुख्याही घिरट्या घालायच्या. वडाच्या झाडावर तर वर्षभर पुष्कळ पक्षी यायचे. कावळे-चिमण्या तर होत्याच, पण भारद्वाज, कोकीळ, बुलबुल, साळुंख्या, दयाळ, कोतवाल आणि वटवट्याही असायचे झाडावर. खारींची धावपळ तर दिवसभर चालू असायची. अधूनमधून धनेश पक्ष्यांची जोडी चक्कर मारून जायची. झाडाच्या खोडावर मुंगळे, मोठ्या काळ्या मुंग्या आणि इतर कितीतरी कीटकांची ये-जा होती.

मुक्ताला ते झाड पाहिलं की, तिचे आजोबा आठवायचे. दिवाळीच्या आणि मे महिन्याच्या सुट्टीत आजोळी जायची, तेव्हा ती आणि तिची मावस-मामे भावंडं आजोबांना अशीच चिकटलेली असायची. दिवसभर त्यांना प्रश्न विचारून आणि गोष्टी सांगायला सांगून अगदी भंडावून सोडायची मुलं. हे झाडही आजोबांसारखंच किती प्रेमानं सांभाळत होतं सगळ्या पाखरांना आणि किडे-मुंग्यांना!

मुक्ताला रोज जाग यायची तीच मुळी पक्ष्यांच्या आवाजांनी. प्रत्येक पक्ष्याचा वेगळा आवाज तिला कधीपासूनच ओळखता यायचा. एकमेकांना ते हाका मारतायत का त्यांच्या गप्पा चालल्या आहेत, हेही तिला माहीत झालं होतं आता. बऱ्याच वेळा बुलबुल आणि दयाळ तिच्या खिडकीत येऊन लकेरी घ्यायचे. मुक्तानं खिडकीबाहेर एक छोटी थाळी ठेवली होती; आईकडून तांदूळ, ज्वारीचे दाणे घेऊन ती त्यात ठेवायची. उन्हाळ्यात वाडग्यामध्ये पाणीही ठेवायची पाखरांसाठी. पक्षी घरटी कधी बांधतात, अंडी कधी घालतात, पिलांना कसं भरवतात, हे सगळं तिला निरीक्षणामुळे माहीत झालं होतं. उठल्यावर आधी त्यांच्याशी गप्पा मारल्याखेरीज तिचा दिवस सुरूच व्हायचा नाही.

'आणि आता..! आता इथे बांधकाम होणार असेल तर ही झाडं पाडणार, कापणार!' मुक्ता या विचारानं फार अस्वस्थ झाली. तिनं कसाबसा पोळीचा लाडू खाल्ला आणि खिडकीत जाऊन ती झाडांकडे बघत राहिली. आज पक्ष्यांचे आवाज आणि भिरभिर कमी झाल्यासारखं तिला उगाचच वाटलं. तेवढ्यात बाबा कामावरून परतले.

''बाबा, मागच्या आठवड्यात सोसायटीची मीटिंग झाली ना? त्या वेळी इथल्या मोकळ्या जागेत बांधकाम करायला तुम्ही सगळ्यांनी परवानगी दिलीत?'' बाबा अजून चपलाच काढत होते; तोवर मुक्तानं विचारलं. त्यांनीही शेजारच्या जागेत माणसांची हालचाल पाहिली होतीच.

''अगं, आम्ही चार-पाच जणांनी विरोध केला, पण बहुतेक जणांना जिम आणि बॅडमिंटन हॉलची कल्पना आवडलीय. त्यातून सोसायटीला उत्पन्नही मिळणारे.

त्यामुळे मग काही इलाज नव्हता.'' बाबा म्हणाले.

''बाबा, काय हे?'' मुक्ता वैतागून म्हणाली. ''एक तर नियम नाही का मोडणार यानं? आणि दुसरं म्हणजे बाहेरच्या माणसांची ये-जा सुरू होणार; आणि मुख्य म्हणजे इथली झाडं तोडली की त्यांच्या आधारानं जगणारे पक्षी-किडे-मुंग्या कुठे जातील? त्यांचं घर आहे ना ते! आपलं घर पाडलं तर कसं वाटेल बाबा आपल्याला?'' मुक्ता कळवळून म्हणाली.

''पण आपल्या हातात काही नाहीये बेटा. उद्या रविवार आहे. उद्याच भूमिपूजन होऊन साफसफाई आणि झाडं तोडायला सुरुवात होणारे, असं ठरलंय मीटिंगमध्ये.''

''अच्छा..'' मुक्ता म्हणाली, पण तिच्या डोक्यात काही तरी वेगळं चालू असल्यासारखा तिचा चेहरा दिसत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारच्या मोकळ्या जागेत लोकांची लगबग सुरू होती. मुक्ता खिडकीतून लक्ष ठेवून होती. भूमिपूजनाला जावं लागेल म्हणून आई-बाबा आवरत होते. पूजेसाठी एक कोपरा गवत आणि झुडपं कापून आधीच साफ केलेला होता.

पूजा झाली आणि बाकीची झुडपं कापायला आणि झाडं तोडायला माणसं आली. ते पाहताक्षणी मुक्ता घराबाहेर धावली आणि शेजारी जाऊन ती दोन्ही हात पसरून वडाच्या झाडासमोर उभी राहिली.

''मी तुम्हांला ही झाडं तोडू देणार नाही.'' तिच्या आवाजाला धार होती आणि चेहऱ्यावर निश्चय! समोरचे सगळे लोक तिचा आविर्भाव पाहून थक्क झाले.

''अगं, आपण इथे छान बॅडमिंटन खेळण्याची सोय करतोय. तुम्हां मुलांचाच विचार केलाय आम्ही.'' काळे काका पुढे होऊन तिला समजावत म्हणाले.

''आम्ही अंगणात खेळतोच की. आणि हा रस्ता फक्त सोसायटीचा आहे; तिथेही खेळू शकतो आम्ही.'' मुक्ता शांत पण ठाम स्वरात म्हणाली. ''पण झाडं तोडली की परत उगवायला किती वर्षं लागतात माहीत आहे ना? आणि त्यामुळे निसर्गाचं किती नुकसान होतं! एक झाड तोडलं की त्याच्या आधारे जगणारे कितीतरी सजीव नाहीसे होतात. त्यामुळे काहीही झालं तरी मी झाडं तोडू देणार नाही.''

मुक्ताचा धीटपणा पाहून ज्यांनी बांधकाम करायला विरोध केला होता, ते पाच-सहा जणही पुढे आले.

''काळेसाहेब, ही एवढीशी मुलगी शहाणपणाच्या गोष्टी सांगतेय आणि आपण मात्र वेडेपणा करायला निघालोय;'' पाटीलकाकू म्हणाल्या. ''तेही सोसायटीला उत्पन्न मिळावं म्हणून. आणि आपला खर्च भागून वर्गणीतले थोडे पैसे बाजूला पडताहेत ना! मग हे कशासाठी?''

सगळे एकदम शांत झाले. ''ठिके, करू आपण विचार.'' काळेकाका एकूण वातावरण बघून म्हणाले. ''मलाही या मुलीचं कौतुक वाटतंय. इतके दिवस मला वाटायचं, मुलांना काय कळतं? पण आज मला समजलं, मुलांना जास्त समजतं.''

मुक्ता अजूनही दोन्ही हात पसरून झाडापाशीच उभी होती. मुक्ताच्या आई-बाबांनी पुढे होत तिला कवटाळलं.

''झाडं वाचवण्यासाठी तू तर एकदम चिपको आंदोलनासारखी लढायला उभी राहिलीस की!'' बाबा तिची पाठ थोपटत म्हणाले.

''म्हणजे काय बाबा! तुम्ही दिलेली सगळी पुस्तकं मी वाचते आणि विचारही करते बरं का!'' मुक्ता लटकं रुसत म्हणाली. ''त्या आंदोलनानं उत्तरखंडातलं केवढं मोठं जंगल वाचवलं; मग मी इथली दोन-चार झाडं वाचवण्यासाठी तोच मार्ग वापरायचा ठरवला. बरोबर केलं ना?'' तिने विचारलं.

''अगदी बरोबर केलंस तू.'' बाबांऐवजी पाटील काकूंनी उत्तर दिलं. ''तुला आता काय बक्षीस देऊ सांग.'' त्यांनी तिला शाबासकी देत विचारलं.

तेवढ्यात मुक्ताच्या डोक्यावरून बुलबुल पक्ष्यांची जोडी गाणं गात गेली. त्यांच्याकडे बघत मुक्ता म्हणाली, ''मला माझं बक्षीस मिळालं काकू.'' आणि ती छान हसली.

**संपर्क : ९८२२०५६१२४**



# माझी मराठी

किरण भावसार

ज्ञानियाची, तुकयाची
भाषा माझी अभिजात
तिला साय अमृताची
गोडी झिरपे मनात

संत, पंत आणि तंत कवी
तिच्या खेळले अंगणी,
नवरस ओथंबले
शाहिरांच्या डफातूनी

दहा मैलांवर तिचे
बघा पालटे रुपडे.
शिव्या, ओव्या, म्हणी आणि गाणी
बोली बोलीत बागडे

रोमारोमांत भिनली
माय मराठी वैखरी
तिच्या दुधावर माझी
फुले साहित्य पंढरी

संपर्क : ७७५७०३१९३३

रवींद्र जंगम




# म्हणोनी म्हणी

शाळा सुरू होऊन शंभर वर्षे झाली. शाळेचा शतक महोत्सव वर्षभर विविध उपक्रमांनी साजरा करण्याचे ठरले, कला उत्सव, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा महोत्सव, रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व, निबंधस्पर्धा, हस्ताक्षर, बालनाट्य, पाककला, लेझीम-झांज पथक, कवायत मनोरे, योग शिबीर, अशा भरगच्च कार्यक्रमांची वर्षभर जणू मेजवानीच होती.

यात्रेच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या गावकऱ्यांसाठी शाळेने स्नेहसंमेलन घेण्याचे ठरले. त्यासाठी अजून एक महिना अवकाश होता. प्रत्येक वर्गातून किमान चार कार्यक्रम सादर केले जावेत, असे मुख्याध्यापकांनी सुचवले आणि सर्व मुले तयारीला लागली.

''आपला कार्यक्रम सर्वांना आवडेल असाच झाला पाहिजे, तुमच्यासाठी हा कार्यक्रम म्हणजे छान पर्वणी आहे,



वेळेचा योग्य वापर करून सराव करा, नाहीतर नमनाला घडाभर तेल अशी आपली अवस्था होईल... एवढे रेंगाळू नका''

मुख्याध्यापकांचे बोलणे सर्वांनी लक्षात ठेवले होते,

आठवीच्या वर्गातील श्रवण मधुराला म्हणाला, ''आपण ऐतिहासिक नाटक सादर करूया. पहिला नंबर आपलाच येईल, टाळ्यांचा कडकडाट होईल आणि बक्षिसांचा पाऊसही पडेल. एवढंच नाही, तर उत्कृष्ट अभिनयाचं पहिले पारितोषिक खात्रीने मलाच मिळणार.''

मधुराला काहीतरी बोलायचे होते पण श्रवणची गाडी सुसाट पुढेच..

''बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झकास झाला पाहिजे. एखादा सिनेकलाकार बोलवू. छान फोटो काढू, बातमी सगळीकडे पसरवू. ताकाला जाऊन भांडे कशाला लपवायचे? जे वाटते ते मी थेट बोलतो.''

आता मात्र मधुराला गप्प बसणे शक्य नव्हते, 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा'; श्रवणचे असे वागणे-बोलणे तिच्यासाठी नवीन नव्हते.

जवळच्या काही मोठ्या माणसांनी त्याला समजून सांगितले होते पण म्हणतात ना, 'ये रे माझ्या मागल्या अन् ताक कण्या चांगल्या' असे श्रवणचे झाले होते.

मधुरा म्हणाली, ''आपण छान नाटक सादर करू, भरपूर सराव करू, योग्य ते पंच घेऊ, रसिक श्रोते आपणास दाद देतीलच पण आपल्याच नाटकाचा पहिला नंबर येणार, असे समजणे हा गर्व झाला. आणि गर्वाचे घर खाली असते, हे विसरून चालणार नाही. शिवाय बक्षीस वितरणासाठी कलाकार येणार, खेळाडू येणार की समाजसेवक येणार हे आपण ठरवणे म्हणजे 'लहान तोंडी मोठा घास' असे होईल, तू असाच अति उत्साहाने वागत राहिलास, तर तुझे कुणाबरोबर पटणारही नाही. मी आज स्पष्टच बोलते. शहाण्याला शब्दाचा मार''

श्रवण अंतर्मुख झाला. मधुराचे बोलणे त्याला पटू लागले. तो विचार करू लागला.

**संपर्क : ९८६०२२८६३३**

बालकादंबरी

भाग २

# पिल्लू

दासू वैद्य



## लाडेलप्पा

मराठीचे सर शिकवताना मध्येच थांबले.ऐन रंगात आलेली कविता अचानक गाडीला ब्रेक लागावा तशी थांबली. वर्गात आमची कुजबूज सुरू झाली. सरांनी नेहमीप्रमाणे टेबलावर जोरात छडी वाजवली. ‘शांत बसाऽऽ, बोलू नका’ अशी नेहमीची ताकीद दिली. वर्ग चिडिचाप झाला. सवयीने माझा नामघोष केलाच, ‘लाडेलप्पा, काय बडबड सुरुये’ ‘सगळेच बोलतायत, मी एकटा काय सांगणार.’ शिकवताना मध्येच अचानक काहीतरी सांगण्याची सरांना सवयच होती. म्हणजे ऐन रंगात आलेली कविता अचानक थांबवून सर म्हणायचे, ‘उद्या पोळाऽय् बरं का. शाळेला सुट्‌टीऽय’ आणि पुन्हा कविता सुरू. आम्हांलाही या अचानक लागणाऱ्या ब्रेकची सवय झाली होती. आजही ब्रेक लागला.

‘वारूळ वारूळ, मुंग्यांचे वारूळ

कृमी कीटकांनी बांधिले देऊळ...’

कविता थांबली. सरांची सूचना सुरू झाली,

‘येत्या शुक्रवारी आपल्या शाळेची सहल शिकारघाटला जाणार आहे. ज्यांना सहलीला यायचे आहे, त्यांनी मधल्या सुट्‌टीत माझ्याकडे नावे द्यावीत.’ हे ऐकल्याबरोबर आम्ही पोरांनी ‘हुय्योऽऽ’ केलं. सरांनी टेबलावर छडी वाजवली. वर्ग चिडिचाप झाला. पुन्हा कविता सुरू झाली.

‘वारूळ वारूळ, मुंग्यांचे वारूळ...’

झालं, त्या क्षणापासून

आमच्या डोक्यांत सहल घुसली. सकाळी जाऊन संध्याकाळी सहल परत येणार होती. तरीही तयारी तर करायलाच हवी ना.  सोबत डब्यात हे हवंय, ते नको, असे हट्ट आयांजवळ सुरू झाले. शिकारघाटबद्दल आम्हांला उत्सुकता होती; पण खरं आकर्षण होतं घाटाखालून वाहणाऱ्या गोदावरी नदीचं. नदीत धिंगाणा करायच्या कल्पना रंगू लागल्या. पाहता पाहता सहल निघण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. सरांनी टेबलावर छडी वाजवून सांगितलं, 'इकडं लक्ष द्या रेऽऽ. उद्या चौकातल्या वडाखाली सकाळी आठ वाजता सगळ्यांनी जमायचं आहे. जेवणाचा डबा विसरू नका. पायांत चप्पल-बूट काहीतरी घालून या. उशीर करू नका.'

आम्ही सगळे 'हुय्योऽऽ' करीत घरी पळालो आणि तयारीला लागलो. सकाळी बरोबर साडेआठ वाजता आमची बस सुटणार होती, तेवढ्यात गोविंदाचं पोट गच्च झालं. त्याला असं बरेचदा होत असे. म्हणीआजी या प्रकाराला' लढाई के टाईम पैखाना' असं म्हणायची. सरांनी त्याला घरी धाडलं, पाच मिनिटांत तो 'फ्रेश' होऊन आलाही. मला खिडकीची जागा मिळाली होती. माझ्याशेजारी चेतन होता, सगळी मुलं जोशात होती. कच्चा रस्ता, पुन्हा त्यात खटारा बस. खड्डा आला की जोरात गचका बसायचा. मुलं जोरात ओरडायची. एकदा तर एका मोठ्या खड्ड्यात बस आदळली आणि आम्ही सीटवर चक्क उडालो, आदळलो. एकदाची बस शिकारघाटच्या पायथ्याशी येऊन थांबली. धडाधड उड्या मारत आम्ही खाली उतरलो, आपले डब्बे सांभाळत, चपला फरकवत सगळे रांगेत चालू लागले. शिकारघाट म्हणजे गुरू गोविंदसिंगांचं शिकारीचं ठिकाण, टेकडीवरचा चढणीचा खडा रस्ता चढून





गेल्यावर गुरुद्वारात सर्व जण गोळा झाले. सुंदर बांधकाम, स्वच्छ परिसर, पण आम्हांला गडबड होती, पुलाखालच्या नदीत नाचायची. घाटाखाली नदीवर बांधलेला पूल भक्कम होता. हा पूल बांधायला पंजाबमधून शीख आले होते, असं वडलांनी सांगितलं होतं. रांगेत राहूनच आम्ही पूल पार केला. पुलाच्या टोकाला खाली नदीपात्रात उतरण्याकरिता पायऱ्या होत्या. त्या पायऱ्यावरून उड्या मारतच आम्ही खाली आलो. खाली पात्रात मऊमऊ वाळू होती. उन्हात या वाळूचा लालसर रंग चमकायचा. शिवाय उन्हात ही वाळू प्रचंड तापणारी. नदीचं पात्र खूप मोठं होतं. पाय उचलला की वाळूत खड्डा पडायचा. लांबवर नदीचं वाहतं पाणी दिसत होतं. कधी एकदा पाण्यात जाऊ, असं झालं होतं आणि एकदम सर बोलू लागले, 'एक मिनिट... सगळे इकडे लक्ष द्या... वाळू तापायच्या आधी झाडाखाली बसून आपण डबे खाऊ या. नंतर तुमचा पाण्यात धिंगाणा चालू द्या. पण पाण्यात काठावर खेळायचं, खोल पाण्यात जाऊ नका. वाहत्या पाण्याला ओढ असते. चला आता, हात धुऊन डबे काढा'. पाहता पाहता गोल पंगत बसली. प्रार्थना म्हणून झाली. वेगवेगळ्या पदार्थांचा वास एकत्र झाला. अन्नाच्या वासानं तीन-चार कुत्री भोवती येऊन बसली. कुत्र्यांचीही चंगळ झाली. पोळी, पुरी, धपाटे वर फेकले की कुत्रे अलगद झेलू लागले. हा खेळ जेवण संपेपर्यंत

सुरूच राहिला. जेवणं संपली.

आम्ही पोरं पाण्याकडे पळालो. 'पाण्यात खोल जाऊ नका रे...' अशी सरांनी पुन्हा सूचना दिलीच. आज छडी नव्हती. उलट सरांचा मूड मस्त होता. रुमालाने तोंड झाकून झाडाखाली सरांची वामकुक्षी सुरू झाली. पाण्यात पाय ठेवल्याबरोबर काही जण आनंदाने ओरडू लागले, सदू आणि नारायण तर शंख शिपले गोळा करण्यात मग्न झाले. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवणं सुरू झालं. मी आणि चेतन सगळ्यांपासून लांब पाण्यात होतो. सगळे कपडे ओले झाल्यामुळे मग रीतसर पाण्यात डुंबायला सुरुवात झाली. पाण्यात पायाला छोट्या मासोळ्या गुदगुल्या करायच्या. मी आणि चेतन मासोळ्यांची गंमत पाहात होतो. आम्ही दोघांनी या मासोळ्या पकडायचा प्रयत्न सुरू केला; पण त्या चपळ मासोळ्या काही हाती लागेनात. शेवटी चेतनने मोठा रुमाल काढला. दोघांनी दोन्ही बाजूंनी रुमाल धरून पाण्यात जाळ्यासारखा फिरवायला सुरुवात केली. खूप प्रयत्नांनंतर दोन मासोळ्या रुमालात अडकल्या. चांगल्याच तडफडत होत्या. म्हणून जेवणाच्या डब्यात पाणी भरून त्यात त्या मासोळ्या ठेवल्या. पुन्हा रुमाल हातांत धरून जरा खोल पाण्यात गेलो. आता चांगलं आमच्या कमरेएवढं पाणी होतं. पायाखाली मऊमऊ वाळू सरकत होती. आमचं रुमाल फिरवणं सुरूच होतं, तेवढ्यात रुमाल एकदम जड लागला. बहुधा मोठा मासा रुमालात अडकला होता. रुमाल घट्ट धरून आम्ही काठावर आलो. पाहतो तो काय, रुमालात चक्क एक कासवाचं पिल्लू आलं होतं. पिल्लू पाहताना विश्वासच बसत नव्हता. घाबरून पिल्लाने पाय-तोंड आत घेतलं होतं. नुसता काळा, गोलसर छोटुसा दगड वाटत होता. सगळंच अद्भुत होतं. चेतनने मोठा डबा विसळून घेतला. त्यात पाणी भरलं आणि मी पिल्लाला डब्यात ठेवलं. पिल्लालाही शांत वाटलं. आता त्याने तोंड बाहेर काढून आमच्याकडे पाहिलंसुद्धा. ही बातमी कुणालाच कळू द्यायची नाही असं आम्ही ठरवलं. आम्ही लांब पाण्यात खेळत असल्यामुळे सोबतच्यांना काही माहीत नव्हतं. प्रत्येक जण आपल्याच मस्तीत होता. मी आणि चेतनने पिल्लाला घरी न्यायचा बेत ठरवला. आमच्या अंगणातल्या मोठ्या हौदात पिल्लाला सोडण्याचं ठरलं. हा प्रकार सरांना कळला असता तर फारच पंचाईत झाली असती.

आता बऱ्यापैकी ऊन उतरलं होतं. वाळू थंड होत होती. सरांनी झाडाखालून हाक दिलीच, 'चला रे पोरांनो, बसची वेळ होतेय.' आम्ही लगबगीने डब्याचं झाकण लावलं. चेतनने अलगद डबा हातातच धरला. काही जणांना पाण्यातून निघवेना. आम्हांला मात्र कधी एकदा घरी जातो असं झालं, पुलावरून चालत बसस्टॉपवर आलो. थोड्या वेळात तीच खटारा बस आली. मी आणि चेतन मुद्दाम मागच्या सीटवर बसलो. हातातला डबा बघून विचारणाऱ्यांना 'म्हणीआजीसाठी गोदावरीचं पाणी नेतोय', असं ठोकून दिलं. सरांनी मुलं मोजली. कंडक्टरने दोरी ओढून टिण टिण घंटी वाजवली. बस सुरू झाली. मध्येच गचका लागायचा. पिल्लाला हवा मिळावी म्हणून मध्येच डबा थोडासा उघडा करायचो. आता बाहेर अंधारून आलं होतं. आमचं लक्ष मात्र कासवाच्या पिल्लाकडे होतं. खूप इच्छा असूनही पिल्लाबद्दल काही बोलता येत नव्हतं. धाडकन् आवाज झाला. बस मोठ्या खड्ड्यामध्ये आदळली. आम्ही सगळे जण सीटवर आदळलो. चेतनच्या हातातला डबा खाली पडला. डब्यातलं पाणी सांडलं. पिल्लू सीटखाली पडलं. अपुऱ्या प्रकाशातही पिल्लू मला दिसलं. झाप मारून मी उचललं. पुढच्या सीटवरचा रवी मागे पाहात होता म्हणून पिल्लाला मी पटकन चड्डीच्या खिशात टाकलं. खिशाच्या तोंडावर हात धरून बसून राहिलो. थोडा वेळ खिशात वळवळ झाली, पण नंतर पिल्लूही शांत बसलं. मला मात्र बागेतला मोठा पेरू खिशात ठेवल्यासारखं वाटू लागलं. खिडकीतून वारा येत होता. दिवसभर पाण्यात खेळल्यामुळं आता धकवा जाणवत होता. सवयीने माझे

डोळे पेंगू लागले. तरी माझा खिशावरचा हात पक्का होता.

नंतर 'चला, उठा रेऽऽ' अशा सरांच्या आवाजानेच जाग आली. बस गावात येऊन थांबली होती. पण वाईट गोष्ट म्हणजे झोपेत माझा खिशावरचा हात सैल झाला आणि नेमकं पिल्लू गायब झाल होतं. चेतनलाही झोप लागली होती. आम्ही घाबरलो. आजूबाजूला, सीटखाली पिल्लाचा शोध सुरू केला. पिल्लू काही सापडेना आणि हरवलंय म्हणून कुणाला सांगताही येईना. मुलं खाली उतरत होती. सरांचं लक्ष आमच्याकडे गेलं. सर ओरडले, 'काय हरवलंय रे तुमचं?' हरवलंय तर खरं; पण सरांना सांगणार कसं ? शेवटी 'रुमाल शोधतोय' म्हणून सांगितलं. सगळे जण खाली उतरले होते. आम्ही दोघंच सीटखाली वाकूनवाकून पाहात होतो. पिल्लू काही दिसत नव्हतं. वाईट वाटतं होतं. डोळ्यांत आपोआप पाणी येऊ लागलं. सरांनी पुन्हा आवाज दिला. जड पावलांनी आम्ही खाली उतरलो. बस निघून गेली. घरी आलो. सहल कशी झाली म्हणून आई विचारत होती. मी काहीही न बोलता झोपी गेलो. म्हणजे डोक्यावरून पांघरूण घेऊन पडून राहिलो. मला रडू येत होतं. झोपही येईना. दुसऱ्या दिवशी शाळेत सगळे खुशीत होते. मी आणि चेतन मात्र अबोल होतो. कशातच लक्ष लागत नव्हतं. अंगणातल्या हौदात पिल्लाला तरंगताना पाहण्याचं स्वप्न संपलं होतं. मला तर चड्डीच्या खिशात पिल्लू आहे असंच वाटायचं. चेतनचा चेहराही लाल झाला होता. मी दुपारीही जेवलो नाही. संध्याकाळी अंगणातल्या हौदावर एकटाच बसलो होतो. हौदातल्या पाण्यात एकटक पाहात होतो. तेवढ्यात म्हणीआजी आली, 'काय झालं रे? तिन्हीसांजेला एकटाच बसलास. आणि हो, आज जेवलाही नाहीस म्हणे. बरं वाटत नाही का?' आता मला रडूच आलं. म्हणीआजीने माझे डोळे पुसले. मला जवळ घेतलं मग मीही म्हणीआजीला नेहमीप्रमाणे सगळं खरं खरं सांगून टाकलं. माझं सगळं ऐकून आजी हसली, नि म्हणाली ''अरे लाडू, ते कासव गेलं असेल त्याच्या त्याच्या घरी; आणि आपल्या हौदात त्याचं काही बरं-वाईट झालं असतं म्हणजे? करायला गेलो गणपती अन् होऊन बसला मारोती, असं व्हायला नको रे''

''नाही म्हणीआजी, मला कासवाचं पिल्लू पाहिजेच''

मी हट्ट सोडला नाही.

''अरे, कासव कधी हरवत नसतं.'' माझी आशा वाढली. ''मग कुठाय ते कासव ?''

''कुठाय म्हणजे विठ्ठल मंदिरात मोठी घंटा आहे ना. त्या घंटेच्या खाली रुसून बसलंय ते.'' मला आनंद झाला. एकदाची रात्र संपली. भल्या पहाटेच मी मंदिरात जाऊन पाहिलं, तर घंटेखाली एक कासव बसलेलं होतं, पण दगडाचं. हळद-कुंकू वाहिलेलं. म्हणीआजीने आपली समजूत काढलीय हे माझ्या लक्षात आलं होतं. आजही असं दगडाचं कासव मी पाहतो, तेव्हा मला बसमध्ये हरवलेल्या पिल्लाची आठवण येतेच येते.

(क्रमशः)

**संपर्क : ९४०३५८४१११**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक - अनुराधा ओक.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.**
*** Editor - Anuradha Oak.**

## ✻ चला चित्र रंगवूया...!!!

चित्र पूर्ण करून छानसे रंगवा. मराठी भाषेत अशी कुठली मुळाक्षरे आहेत ज्यांचा उच्चार इतर भाषेत केला जात नाही ती शोधून काढा. मराठी भाषेतील; मुळाक्षरांचा वापर करून पुस्तकात ठेवण्यासाठी छानशी नक्षी बनवा.

रेश्मा बर्वे






# रागीट रिंकू!

भाग २




**डॉ. नंदू मुलमुले**

ही कहाणी आहे रिंकू नावाच्या एका रागीट मुलीची. रिंकू जणू नाकावर राग घेऊनच जन्माला आली होती. उठल्यापासून तिची चिडचिड सुरू व्हायची. 'आईने सकाळी उठवलं तर, का उठवलं, आणि झोपू दिलं तर, का 'नाही उठवलं?'

'शाळेला जायची वेळ झाली, मला सगळं घाईघाईत करावं लागतं. उठवलं का नाहीस?' हाच संवाद; उठवलं तर असा व्हायचा, 'सक्काळपासून उठवून ठेवते. झोप म्हणून घेऊ देत नाही. मला काय जाऊन झाडायची आहे का शाळा?'

रागीट रिंकूशी कसं वागायचं हे आईला कळायचं नाही. बाबाही हात टेकायचे. दिवसा ''बाबा, मोठ्याने गाणे म्हणू नका, मला अभ्यास करायचाय,'' आणि रात्री ''दादा, डासांसारखं गुणगुणू नको, मला झोप येत नाहीय,'' अशी तिची विनाकारण चिडचिड चालायची! आईने पालकाची भाजी केली तरी किरकिर, वांग्याची भाजी केली तरी किरकिर.



''रोऽऽज डब्यात वांगे, डोक्याचं नुसतं भरीत'', तर कधी ''येताजाता पालक, बकरी झाली माझी!'' करायचं तरी काय?

रिंकू नुसती तूप-साखर पोळी खायची. ''अगं इतकं तूप खाणं चांगलं नाही'' असं म्हटलं की रिंकूने तुपाचे गोळेच्या गोळे तोंडात कोंबलेच समजा! गणित नाही सुटलं तर चिडचिड, केस गुंतले की चिडचिड. पतंग नाही उडाला की चडफडत फाडलाच समजा. मग सारे टेन्शनमध्ये. बाबांचं हाताची घडी, तोंडावर बोट. दादा पुस्तकात, आई स्वयंपाकघरात.

या उलट रिंकूची मैत्रीण विनू, विनिता. सतत हसायची. दोन्ही जिवण्या नेहमी वर गालात शिरलेल्या. गणित चुकलं की तिला हसायला यायचं, पतंग गरगर गोते खात पडला की हसायला यायचं. बाबांनी गाणं म्हटलं की हसायला यायचं, आईच्या हातून भांडं पडलं की हसायला यायचं. ताप आल्यावर देखील डॉक्टरकाकांच्या पट्ट्याच्या पॅन्टला बघून हसायची. उंदीर बिळात शिरला की हसायची, मांजर पंजे चोळत बसली की हसायची!

''किती सारखी हसतेस,'' तिच्या आईलाही हसू यायचं. बाबा बेसूर गाऊ लागले की विनूकडे पाहायचे, ती हसली की तेही हसायचे. मग आई, दादा, सारे हसू लागायचे. सारं घर हसायचं. कोपऱ्यात बसलेला टॉमी सुद्धा हसत शेपटी हलवायचा!

दोघी मैत्रिणी. रिंकू म्हणायची, ''विने, इतकी काय हसतेस?'' तर विनी म्हणायची, ''रिंके, इतकी काय चिडचिड करतेस?''

''मग काय करू? सारे मला त्रास द्यायला बसलेत. एक काम नीट होत नाही. वैताग सारा. मग डोकं दुखायला लागतं माझं.''

''चिडचिड केल्याने काम नीट होते? सारे छान वागतात? डोकं थांबतं?''

''नाही. पण मग..'' रिंकू विचारात पडली. ''मग काय करायचं?''

''मग काही नाही. हसायचं! हसलं की बरं वाटतं. मला माझ्या डॉक्टर काकांनी सांगितलं, राग का येतो? कारण सगळं आपल्या मनासारखं होत नाही. पण सगळं मनासारखं कधी होईल?''

रिंकू विचारपूर्वक ऐकायला लागली.


''डॉक्टरकाकांनी एक छान गंमत दाखवली. एक चित्र,'' विनूने दप्तरातून एक चित्र काढलं. ''या चित्रात

तुला काय दिसतं?'' मजेदार चित्र होतं ते. **(आकृती १)**



''एक सफरचंद दिसतंय, अर्धवट खाल्लेलं.''


''मला एक चष्मा घातलेला माणूस दिसतोय!'' विनूने असे म्हणताच रिंकू बारकाईने पाहू लागली. ''खरेच की!'' ''आता हे चित्र पहा,'' विनूने जादूगारासारखे दुसरे चित्र काढले. **(आकृती २)**



''काय दिसते?''

''एकमेकांकडे तोंड केलेली दोन माणसे...नाही, एक फुलदाणी दिसतेय,'' रिंकूला मजा वाटू लागली. 'पण याचा माझ्या रागाचा काय संबंध?''

''डॉक्टरकाका म्हणाले, जसं कुणाला फळ




दिसतं... कुणाला माणूस, एकाला फुलदाणी दिसते दुसऱ्याला दोन तोंडे, तशी प्रत्येक गोष्ट कुणाला चांगली कुणाला वाईट. एकाला प्रत्येक गोष्टीचा राग येतो, दुसऱ्याला प्रत्येक गोष्टीचं हसू! मग आपलंच बरोबर असं कसं होईल?'' विनू रिंकूकडे मजेने पाहू लागली. रिंकू वरमली.

''डॉक्टरकाका म्हणाले, हे जग आपण पाहू तसं आहे, मानलं तर वाईट, मानलं तर छान छान. मग चिडचिड करून डोकं कशाला तापवायचं? आपल्या प्रत्येक फजितीवर हसता आलं पाहिजे. पडलो तर हसायचं, चुकलो तर हसायचं. हसत खाल्ली तर पालकाची भाजीही छान लागते! आपण हसलो तर सारे हसतात, भोवताली सारे हसरे असले की मन शांत राहतं. आनंद वाटतो. आपल्या कवितेसारखा,'' विनू गायला लागली. रिंकूनेही फेर धरला;

''आनंदी आनंद गडे..इकडे तिकडे चोहीकडे..''

(क्रमशः)

**संपर्क : ९४२२८७३३०३**

# आज काय झालं ?



कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८

नेहमीप्रमाणे आपल्याला भेटायला आले आहेत - कुहू - नील ही भावंडं. त्यांना आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबद्दल प्रचंड कुतूहल असतं. त्यातूनच घडतात अनेक गमतीजमती. आज त्यांच्याकडे खुर्चीचा मोडलेला पाय दुरुस्त करायला सुतार काम करणाऱ्या काकांना बोलावलं आहे, पण त्याआधी...




बालदोस्तांनो, तुमच्याबाबतीत पण असं कधी घडलंय का? तुमची झालेली फजिती नक्की लिहून पाठवा :)

बालभारतीच्या कविता

# नामदेवांची अभंगवाणी

भाग २

**कवी – संत नामदेव (१२७० – १३५०)**

डॉ. संगीता बर्वे

(१)


नाचू कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावू जगीं ।।१।।
सर्व सांडुनी माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।।२।।
परेहून परतें घर । तेथें राहूं निरंतर ।।३।।
सर्वांचे जें अधिष्ठान । तेंचि माझें रूप पूर्ण ।।४।।
अवधी सत्ता आली हातां । नामयाचां खेचरी दाता।।५।।

(२)

आकल्प आयुष्य व्हावे तयां कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासां ।।१।।
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं ।
हे संतमंडळी सुखी असो ।।२।।
अहंकाराचा वारा न लागो राजसां ।
माझ्या विष्णुदासां भाविकांसी ।।३।।
नामा म्हणे तया असावें कल्याण ।
ज्या मुखीं निधान पांडुरंग ।।४।।

(३)

परिसाचे निसंगे लोह होय सुवर्ण ।
तैसा भेटे नारायण संतसंगें ।।१।।
कीटकीं ध्यातां भृंगी झाला तोचि वर्ण ।
तैसा भेटे नारायण संतसंगें ।।२।।
वनस्पति परिमळु चंदन झाला जाण ।
तैसा भेटे नारायण संतसंगें ।।३।।
अग्निस मिळे तें न ये परतोन ।
तैसा भेटे नारायण संतसंगे ।।४।।
सरिता ओघ जाय सिंधूसि मिळून ।
तैसा भेटे नारायण संतसंगे ।।५।।
नामा म्हणे केशवा मज देई संतसंग।
आणिक काही तुज ना मागे बापा ।।६।।



संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा आणि भागवतधर्माचा प्रसार करण्याचे मोठे कार्य केले. त्या काळात म्हणजे इ.स.१३ व्या शतकात प्रचाराची आणि प्रवासाची फारशी साधने नव्हती, तरीदेखील महाराष्ट्राबाहेर गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेश, हरियाणा, पंजाबपर्यंत संत नामदेवांनी भागवतधर्माची पताका फडकवली. पंजाबमध्ये तर नामदेवांचे अनेक शिष्य होऊन गेले. विष्णुस्वामी, लध्धो, जाल्लो, केसो हे त्यांचे पंजाब प्रांतातील प्रमुख शिष्य. तेथील 'घुमान' या गावी नामदेवांचे स्मारकमंदिर आहे. 'गुरूद्वारा बाबा नामदेवजी' या नावाने ते प्रसिद्ध आहे. शिखांचा आदिग्रंथ 'ग्रंथसाहेब' यात नामदेवांची एकसष्ट पदे समाविष्ट केली आहेत. भागवतधर्माचा प्रसार आणि प्रचार हेच त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. सर्व संतांमध्ये नामदेवांना ऐंशी वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. त्यातील जवळजवळ चोपन्न वर्षे त्यांनी भ्रमंती केली. आपल्या अभंगांमधून ज्ञानाचा आणि भक्तीचा प्रसार केला.

अतिशय साधी, सोपी भाषा आणि पांडुरंगाविषयीची अपार भक्ती यांनी त्यांचे अभंग नटले आहेत.

(१)

नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी। असे म्हणत त्यांनी भागवतधर्माच्या प्रचाराचा झेंडा हाती घेतला. या अभंगामध्ये संत नामदेव म्हणतात,

आपण सारे जण कीर्तनामध्ये रंगून जाऊया. आनंदाने नाचूया. विठ्ठलाचे नामस्मरण करून संपूर्ण जगात ज्ञानाचा प्रसार करूया ।।१।।

आपण आपल्यातल्या अहंकारी वृत्तीचा त्याग करू, 'मी' 'माझे' ही भावना समूळ नष्ट करू आणि वाचेने सतत विठ्ठलनामाचा गजर करू ।।२।।

परा वाणीहूनही पलीकडे ईश्वराचे घर आहे तेथे आपण कायम राहू ।।३।।

सर्वांच्या हृदयामध्ये अढळ स्थान असणारा जो विठ्ठल तोच माझे पूर्ण रूप आहे.।।४।।

तो विठ्ठल, तो परमेश्वर भेटला म्हणजे सर्व सत्ता हाती आल्यासारखेच आहे आणि हे मिळवून देणारे नामदेवांचे गुरू – विसोबा खेचर आहेत. ।।५।।

परमेश्वराची भक्ती किती प्रकारांनी करता येते हे अनेक संतांनी सांगितले आहे. परमेश्वराचे नामस्मरण करणे, 'मनातल्या मनात परमेश्वराचा धावा करणे, मूर्तीची पूजा करणे' अशा प्रकारे भक्ती केली जाते.

मात्र ज्ञानदेव, नामदेवांपासून सर्व संतांचे मोठेपण हे की, त्यांनी आत्मोद्धाराचा मार्ग सर्वश्रेष्ठ मानला नाही, त्याहीपेक्षा लोकोद्धार करणे त्यांनी महत्त्वाचे मानले. हरिनामाचा गजर करणे म्हणजे सर्वांनी मिळून एकत्रितपणे अभंगाचे गायन करणे आणि त्या अभंगगायनात तल्लीन होऊन देहभान विसरून नाचणे. हाच मार्ग नामदेवांनी स्वीकारला, आणि आपली भूमिका 'नाचू कीर्तनाचे रंगी' अशी घोषणा करून स्पष्ट केली. मात्र ही केवळ भाबडी भक्ती नाही. त्यापाठोपाठ त्यांनी 'ज्ञानदीप लावू जगी' असे म्हटले. भक्ती आणि ज्ञानाचा मेळ घालून परमेश्वराची प्राप्ती करून घेऊ असे त्यांनी या ओळींतून सुचवले आहे. अहंकाराचा त्याग करून समूहभक्तीला नामदेवांनी महत्त्व दिले.

परेहुनि परते घर! या ओळीमध्ये परावाणीच्या पलीकडे असणारे परमेश्वराचे घर असे नामदेवांनी म्हटले आहे. परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी हे वाणीचे चार प्रकार आहेत. त्यांपैकी वैखरी म्हणजे जिभेचा वापर करून बोलतो ती वाणी. परावाणी ही आत्म्याची अव्यक्त वाणी मानलेली आहे. त्याही पलीकडे भक्ताने पोचायचे आहे म्हणजे परमेश्वराची प्राप्ती होईल असे नामदेवांनी सुचवले आहे. शेवटच्या ओवीमधून गुरूचे महत्त्व सांगितले आहे. भाबड्या भक्तीला डोळस करण्याचे काम गुरू करतो. म्हणून गुरूची सत्ता सर्वत्र आहे. तोच देणारा आहे. असे आपल्या गुरूविषयी, विसोबा खेचरांविषयी आदर व्यक्त करताना नामदेवांनी म्हटले आहे.

(२)

'आकल्प आयुष्य व्हावे तयां कुळा।' असे म्हणत नामदेवांनी परमेश्वराकडे भक्तांच्या कल्याणासाठी मागणे केले आहे. ते म्हणतात,

माझ्यासवे असणाऱ्या सर्व भक्तांना दीर्घायुष्य लाभू दे ।।१।।

कोणत्याही शंकाकुशंकांनी त्यांचे मन ग्रासू देऊ नकोस. सर्वांना सुख लाभू दे ।।२।।

हे राजसा, माझ्या विष्णुदास भाविकांच्या मनात अहंकार जागृत होऊ देऊ नकोस ।।३।।

पांडुरंगा, या सर्वांचे तू कल्याण करावेस असे मागणे, तुझा भक्त नामदेव तुझ्याकडे मागतो आहे. ।।४।।

जग अस्तित्वात आहे तोपर्यंत म्हणजे अगदी कल्पान्तापर्यंत सर्व भक्तांना सुखसमाधान लाभावे. केवळ भक्तांनाच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुळाला दीर्घायुष्य लाभावे असे दान त्यांनी देवाकडे मागितले आहे. भक्तांचे मन निर्मळ राहू दे अशी प्रार्थना नामदेवांनी देवाकडे केली आहे. अध्यात्माच्या अधिकारास पात्र झालेल्या भक्तांना आपणच सर्वश्रेष्ठ भक्त आहोत असा अहंकार निर्माण होण्याची शक्यता असते. स्वतः नामदेवदेखील या अनुभवातून गेले होते. माझ्या हातून देव जेवतो म्हणून मी देवाचा सर्वश्रेष्ठ भक्त आहे असा त्यांचा काही काळ समज झाला होता. मात्र अहंकाराचा त्याग करावयास हवा हे त्यांच्यासारख्या श्रेष्ठ भक्तानेच जाणले आणि 'अहंकाराचा वारा न लागो राजसां।' असे म्हणत स्वतःच्या मनाबरोबरच इतर भक्तजनांनाही उपदेश करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले.

शेवटच्या ओवीमध्ये नामदेव म्हणतात, 'नामा म्हणे तया असावें कल्याण। ज्या मुखीं निधान पांडुरंग।।' या ठिकाणी निधान म्हणजे सर्वस्वाचा ठेवा.

या जगात पांडुरंगाच्या नावाखेरीज भक्ताला दुसऱ्या कुठल्याही गोष्टीत सुख मिळणार नाही. ध्यानी, मनी, स्वप्नी केवळ पांडुरंगाचाच ध्यास लागला म्हणून पांडुरंग हेच निधान आहे असे नामदेवांनी म्हटले आहे.

संत नामदेवांचे सर्व आयुष्य विठ्ठलमय झाले होते. आपल्याला आलेल्या अनुभूतींचा व अनुभवाचा उपयोग त्यांनी इतर भक्तजनांच्या सुखासाठी केला आणि यासाठी परमेश्वराजवळ मागणे मागितले हे या अभंगामधून प्रत्ययाला येते.

(३)

'परिसाचे निसंगे लोह होय सुवर्ण।' या अभंगामध्ये संत नामदेवांनी संतसज्जनांच्या संगतीमुळे काय काय चांगल्या गोष्टी घडू शकतात हे सांगितले आहे. संतांचा सहवास लाभला तर सामान्य मनुष्यात कोणकोणते बदल होतात हे सांगताना नामदेव म्हणतात,

'परिसाच्या संपर्काने जसे लोखंडाचे सोने होते त्याप्रमाणे संताच्या संगतीत राहिल्याने परमेश्वर आपणास भेटतो ।।१।।'

सुरवंट आपल्या कोषामध्ये काही काळ ध्यानस्थ बसतो आणि नंतर त्याला भ्रमराचे रूप प्राप्त होते तसे संताच्या सहवासाने आपल्या मनातले विकल्प जाऊन नारायणाचे रूप पाहण्याचे सामर्थ्य सामान्यजनांना प्राप्त होते ।।२।।

चंदनाच्या झाडाशेजारी दुसरे झाड उभे असेल तर त्यालाही चंदनाचा सुगंध प्राप्त होतो त्याप्रमाणे संताच्या संगतीत सामान्यांनाही त्यांच्या गुणांचा सुवास लाभतो. त्यांच्यातील दुर्गुण नष्ट होतात आणि त्यांना परमेश्वरभेटीचा लाभ होतो ।।३।।

अग्नीमध्ये जसे सर्व काही जळून खाक होते तसे संतांच्या संगतीने मनुष्याचे सर्व दोष नष्ट होतात आणि त्याच्यासाठी परमेश्वरप्राप्तीचा मार्ग सुकर होतो. ।।४।।

नदीचा ओघ ज्याप्रमाणे विराट सागराला जाऊन मिळतो आणि एकरूप होतो तसा सामान्य माणूस संतांच्या सहवासात एकरूप झाला की त्यालाही परमेश्वर भेटतो.

नामदेव महाराज म्हणतात, हे परमेश्वरा, संतांच्या सहवासाने जर तुझ्या भेटीचा लाभ होत असेल तर मला त्यांचा सहवास लाभू दे. यापेक्षा माझे तुझ्याकडे काहीही मागणे नाही.

अशा प्रकारे या अभंगामध्ये नामदेवांनी संतसंगतीची महती वर्णन केली आहे.

संतांचा सहवास हा परिसासारखा असतो. कारण परिस अत्यंत सामान्य, जडशीळ अवस्थेतल्या लोखंडाला सुवर्णाचे रूप देतो. मात्र स्वतः सुवर्ण होत नाही त्यामुळे त्याचे श्रेय हे सर्वांत मोठे आहे कारण तो निःस्वार्थीपणे परोपकार करतो. संतांची महती अशी असते. ते परोपकारी असतात. सामान्य माणसाचे आयुष्य उन्नत करण्याचे काम ते करत असतात.

नामदेवांनी वेगवेगळे दृष्टान्त देऊन संतसंगतीची महती या ओव्यांमधून वर्णन केली आहे. चांगल्या माणसांच्या सहवासात 'नराचा नारायण' होऊ शकतो, हे या अभंगामधून त्यांनी सांगितले आहे.

(क्रमशः)

**संपर्क : ९४४५९९५६९३**

## इ. ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीच्या' दर्जेदार व गुणवत्तापूर्ण स्वाध्यायपुस्तिका


















### ठळक वैशिष्ट्ये

- प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
- स्वयं अध्ययनास चालना देणारी
- लेखनाचा अधिकाधिक सराव
- प्रश्नप्रकारांमध्ये वैविध्य
- विषयांचे दृढीकरण
- जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
- पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकांच्या पलीकडील ज्ञानाच्या वाढीला चालना देणारे प्रश्न
- महाराष्ट्रातील शिक्षण तज्ञ व अनुभवी शिक्षकांचा लेखन सहभाग
- अल्प किंमतीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य






















**स्वाध्याय पुस्तिकांच्या खरेदीवर ४०% सवलत**

**वरील स्वाध्यायपुस्तिकांच्या खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा.**

**विभागीय भांडारे** पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८


**मराठी अभिजात भाषा झाली, आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी ‘बालभारती’ आणि महाराष्ट्र शासनाचा ‘मराठी भाषा विभाग’ मिळून ‘अभिजात मराठी’ हा उपक्रम राबवत आहे. पुढील विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

## अभिजात मराठी भाषेतील ध्रुवतारा :

# कविश्रेष्ठ कुसुमाग्रज!

प्रवीण दवणे

आपली मराठी भाषा समृद्ध आहे, सुंदर आहे, याचे कारण इथे अमृताशी पैजा जिंकणाऱ्या आपल्या मराठी भाषेतून अजरामर काव्य निर्मिती करणारे संत कवी आहेत, जीवन दृष्टी देणारे विचारवंत आहेत; भाषेला समर्थ काव्य, नाटक आणि ललित लेख देणारे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्यासारखे कवी आहेत. नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला, आनंद , कौन्तेय अशा अनेक उत्कृष्ट नाटकांचे ते नाटककार आहेत. लेखनकर्तृत्वामुळे त्यांच्या सन्मानार्थ एका ताऱ्याला कुसुमाग्रज हे नाव दिले आहे. भारतीय साहित्यातील सर्वश्रेष्ठ साहित्याला जो ज्ञानपीठ पुरस्कार दिला जातो, त्या पुरस्काराचे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणजेच वि.वा.शिरवाडकर हे मानकरी आहेत. त्यांनी मराठी भाषेसाठी जे अपूर्व योगदान दिले, त्या कार्याचा सन्मान म्हणून २७ फेब्रुवारी हा कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस ‘मराठी राजभाषा गौरव दिवस’ म्हणून आपण साजरा करतो. तो याच महिन्यात आहे. म्हणूनच अभिजात मराठीचे ‘वेचू आनंदे’ हे या वेळेचे मनोगत विशेष आहे.



क विश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणजेच विष्णू वामन शिरवाडकर. आपल्या किशोर वाचक पिढीवर त्यांचे विशेष प्रेम.

सहजपणे मनाला बोध देणारी त्यांची कविता कल्पनेचे पंख लेऊन येते. कुसुमाग्रज कवितेतून निसर्गाशी बोलतात आणि त्यातून आपल्याशी हितगुज करतात. 'उठा उठा चिऊताई' ही त्यांची कविता आपल्याला आनंद देत आळस झटकून कामाला लागा, हे सुचवते. उजाडल्यानंतरही डोळे मिटून झोपलेल्या चिऊताईला कवितेतील बालक म्हणतो,

**उठा उठा चिऊताई**
**सारीकडे उजाडले**
**डोळे तरी मिटलेले**
**अजूनही**

आता तिच्या घरट्यापाशी सूर्याचे किरण आलेले आहेत. हे सांगताना, त्यांचे शब्द किती हळुवार होतात,

**सोनेरी हे दूत आले**
**घरट्याच्या दारापाशी**
**डोळ्यांवर झोप कशी**
**अजूनही!**

आता रवि किरणांची 'सोनेरी दूत' ही उपमा आपल्याला आनंद देते, नि आपल्याला भाषेच्या संपन्नतेचा दागिना मिळत राहतो. पुढे ह्या चिऊताईला बाळ विचारतो,

असेच झोपून राहिले तर बाळाला चारापाणी कोण आणणार? अशा गोड सुचवण्यातून उत्साहाचा मंत्र आपल्याला सहज मिळतो. बाळाची आठवण करून देताच चिऊताई चटकन जागी होते नि पंख उघडून चारा आणण्यास आकाशी झेप घेते.

पाठ्यपुस्तकाचे बोट धरून कवी कुसुमाग्रज यांची कविता आयुष्यात आली. ज्याप्रमाणे पैलू पडलेले रत्न लखलखते, त्याप्रमाणे कुसुमाग्रज यांच्या शब्दांनी मन दीपून जाते. आपली भाषा म्हणजे सरस्वतीच्या कंठातील सुवर्णकोंदणात जडवलेला रत्नहार भासू लागतो.

शब्द केवळ शब्दकोशातील अक्षरे न राहता त्याचेही सुरेख निळे फुलपाखरू होते.

'निळा पक्षी' ह्या कवितेतील ह्या देखण्या नाजूक पाखराचे त्यांनी केलेले हे वर्णन पहा.

**फुलवून आपला दिव्य पिसारा नाच पदांचा करी**
**नवरत्नांचा झुलतो पंखा गमे लतेच्या शिरी!**

निळ्या पक्ष्याचा पिसारा इतका सुंदर, की जणू नाजूक वेलीवर रत्न माणकांचा चमचमता पंखाच झुलत आहे. मित्रमैत्रिणींनो, हा सुंदर निळा पक्षी आपल्याही डोळ्यांना दिसू लागतो. रसिकाला सौंदर्यदृष्टी देण्याची किमया श्रेष्ठ कविता करते.

जसे निळ्या पक्ष्यांचे हे अपूर्व सौंदर्य कुसुमाग्रज व्यक्त करतात, त्याचप्रमाणे निळ्या समुद्राचे रौद्र रूपही ते व्यक्त करतात. तीच मराठी भाषा, तेच कुसुमाग्रज, परंतु त्यांचे 'सांगणे' बदलले की आपोआपच कवितेचे रूपरंग बदलते. कुसुमाग्रजांनी आपल्या कवितांतून वाचकांना नवी उमेद दिली. इतिहासातील पराक्रमी महानायकही त्यांच्या कवितांचे विषय झाले. एकाच वेळी भाषेचे सौंदर्य आणि नव्या जिद्दीची, पराक्रमाची तेजस्विता त्यांच्या लेखनातून प्रकटली. 'कोलंबसाचे गर्वगीत' ही त्यांची गाजलेली कविता. या कवितेतून समुद्रातून गलबताने भूमीच्या शोधात निघालेल्या कोलंबसाचे मन भारावणारे दर्शन आपल्याला घडते.

खवळलेल्या समुद्राचे असे डोळ्यांपुढे चित्र उभे करणारे वर्णन किशोर मित्रमैत्रिणींनो आपण क्वचितच वाचले असेल. पहा :

**हजार जिव्हा तुझ्या गर्जू दे,**
**प्रतिध्वनीने त्या समुद्रा डळमळू दे तारे!**
**विराट वादळ हेलकावू दे पर्वत पाण्याचे**
**ढळू दे दिशा कोन सारे !**

समुद्राच्या लाटा कवीला गर्जना करणाऱ्या हजार जिभा वाटतात. वादळाने त्या उंच उंच उसळतात तेव्हा जणू पाण्याचे महापर्वत उसळतात.

आता ह्या ओळी वाचतानाही हृदयात तो दशदिशा

डळमळीत करणारा रुद्ररूपातील समुद्र येतो की नाही? हीच आपल्या अभिजात भाषेची शक्ती आहे.

माझे भाग्य हे की थोर कविश्रेष्ठ कुसुमाग्रज ह्यांना पुन्हा पुन्हा भेटण्याचे, त्यांचा 'पाठीवरती हात फिरवून, फक्त लढ म्हणा!' सांगणारे आशीर्वाद लाभले. आज आपण जे लिहितो, बोलतो त्या मागे संत कवी, शाहीर, लोक कवी, विविध बोली भाषांतील कित्येक अज्ञात साहित्यिक तसेच कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर, विंदा करंदीकर, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, अशा अनेकानेक प्रतिभावंतांच्या लेखनाचे ऋण आहे.

हेच धन वेचून साहित्य व जीवनाचे वैभव वाढवत राहायचे. सतत केलेल्या वाचनातून ही कधीच कमी न होणारी, भाषेच्या समृद्धीची कमाई वाढते.

आजच्या आपल्या मनोगतातून कुसुमाग्रजांच्या अनेक कवितांचा उल्लेख आला आहे. किशोर मित्र मैत्रिणींनो, 'मराठी राजभाषा दिवस' साजरा करताना या कविता संपूर्ण मिळवा. त्याचे वर्गावर्गांतून वाचन करा. 'कणा' ही त्यांची अतिशय प्रसिद्ध कविता आहे.ह्या कवितेतून तुमच्यासारखा एक गुणी विद्यार्थी आणि त्याचे आवडते आदरणीय गुरुजी यांचा नाट्यपूर्ण संवाद आहे. त्या कवितेतील प्रसंग मनाला उभारी देणारा आहे.

**मोडून पडला संसार पण मोडला नाही कणा**
**पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा**

असे सांगणारी, आपल्याला जिद्दीचा महामंत्र देणारी ही सदा सतेज कविता. आपल्या आई–बाबांना आणि गुरुजींना ही कविता माहीत आहे. त्यांच्याकडून ही कविता मिळवा; आणि 'राजभाषा दिनी' ती सादर करा. वाचनातून मिळालेला आनंद व्यक्त करा. मराठी भाषेचे सौंदर्य आणि जगण्याची दृष्टी त्यातून कशी मिळवली हे सांगायला विसरू नका. ऐकाल माझे?

(क्रमशः)

**संपर्क** : ९८२०३८९४१४

**खाली दिलेल्या माहितीवरून योग्य शब्द ओळखा आणि आपला शब्दसंग्रह वाढवा. अट एकच, शब्द 'क' ने सुरू होणारा आणि काना, मात्रा, वेलांटी, उकार विरहित हवा– (३ अक्षरी)**

१) काव्य अथवा कवितेस समानार्थी शब्द
२) दया
३) कट कारस्थान
४) कौशल्य
५) आपले राष्ट्रीय(देशाचे) फूल
६) कठीण गोष्ट, पदार्थ
७) महाशिवरात्रीला खाल्ले जाणारे फळ
८) सोन्यासाठी प्रतिशब्द
९) डोक्याला लावतात ती मेंदी, रंग
१०) कायद्यातील विशिष्ट नियम उपनियम
११) भांडणास प्रतिशब्द
१२) कडधान्य शिजवून बनवले जाणारे कढीसारखे, सूजवजा पेय
१३) देवळाबाहेरील सर्वोच्च स्थान, प्रसंगी वारकरी ज्याचे दर्शन घेतात.

– ज्योती देशपांडे

(उत्तरे पुढील अंकात)

# अर्थ शोधण्यासाठी मित्र

डॉ. नीलिमा गुंडी

आज किमयाच्या शाळेला सुट्टी होती. तिच्या शाळेचे स्नेहसंमेलन कालच संपले होते. ती आईला संमेलनातल्या गमतीजमती सांगत होती. ती हसत हसत आईला म्हणाली, ''आई, माझ्या दोन्ही बाजूला दोन पृथ्व्या बसल्या होत्या हं!'' आई आश्चर्य वाटून म्हणाली, ''म्हणजे?''



# अर्थाचा पत्ता सापडला



''अगं, माझ्या उजव्या बाजूला 'मही' बसली होती नि डाव्या बाजूला 'अवनी' बसली होती! तू मला 'पृथ्वी' या शब्दाचे समानार्थी शब्द शिकवले आहेत. त्यामुळे त्यांच्या नावांचे अर्थ मला कळले नि हसू आलं! गंमत म्हणजे महीला तिच्या नावाचा अर्थ माहीतच नव्हता!'' किमया म्हणाली. तेवढ्यात केदार आला नि म्हणाला, ''आई, तू म्हणतेस ते अगदी बरोबर आहे गं! शब्दांचे अर्थ शोधण्यासाठी मित्र आहेत. ते मित्र म्हणजे तऱ्हेतऱ्हेचे कोश! मला काल बक्षीस म्हणून शाळेने समानार्थी शब्दांचा कोश दिला आहे. खूप मजा येते तो वाचताना!'' आईने केदारला शाबासकी दिली.

केदारला काहीतरी शंका होतीच! ''आई, संग म्हणजे सहवास, हे मला माहीत आहे. काल आमच्या शाळेत जे पाहुणे आले होते ना, त्यांची ओळख करून देताना एक अवघड शब्द वापरला होता. त्यात 'संग' हा शब्द होता. पण मला त्या शब्दाचा अर्थ नीट कळला नाही!'' केदारची शंका ऐकून आई पटकन म्हणाली, ''अरे, 'व्यासंगी' असा शब्द असेल. ते पाहुणे विद्वान होते ना! 'व्यासंग' म्हणजे सखोल अभ्यास. असे विद्वान लोक पुस्तकांच्या सहवासात रमतात. त्यांच्याकडे ज्ञानाचा ठेवा असतो. खूप गोष्टी माहीत असताना त्यांना ! तू शाळेत वाचनालयात जाऊन शब्दकोश चाळत जा! त्यात तुला अडलेल्या शब्दांचे अर्थ मिळत जातील!'' ''हेऽऽ!'' केदार आनंदाने उड्या मारू लागला.

आता किमयाला काहीतरी विचारायचं होतं. ''आई, महीचा भाऊ आहे ना! महेश त्याचं नाव आहे. त्याला साधे-साधे शब्द माहीत नाहीत. शरीराच्या अवयवांची नावंही त्याला मराठीत माहीत नाहीत. मी त्याला म्हटलं, 'अरे, तुला डॉक्टर व्हायचंय ना! मग इतकं तरी मराठीचं ज्ञान हवं की रे तुला! तो मला विचारत होता की, 'कोपर आणि ढोपर यात फरक काय? मी त्याला हसून म्हटलं. 'तुझं डोकं गुडघ्यात आहे!' तेही त्याला कळले नाही! मग मी त्याला 'कोपर' म्हणजे हाताच्या मध्यभागी असलेला सांधा 'हे तू कोशातून सांगितलेले अर्थ पटवून दिले. आणि हो! ढोपर म्हणजे गुडघा हेही सांगितलं! मात्र मी 'डोके गुडघ्यात असणे' या वाक्प्रचाराचा अर्थ त्याला वाक्प्रचारांच्या कोशात शोधायला सांगितला हं!'' आईला साहजिकच तिचं कौतुक वाटलं.

आई म्हणाली, ''आता माझी गंमत सांगते. मी लहान असताना आजोळी जायचे. तेव्हा आजी म्हणायची, ''कणा काढ गं अंगणात!'' मला अर्थच कळायचा नाही. मी मोठी झाल्यावर कळलं की, 'कणा' म्हणजे रांगोळी. हा शब्द जुन्या काळच्या मराठीतला आहे हं! जुन्या मराठी शब्दांचे अर्थ सांगणारेही कोश आहेत!''

''आई, तू म्हणजे कोशांच्या माहितीचा चालता बोलता कोश आहेस!'' केदार आणि किमया तिला हसून म्हणाले.

(क्रमशः)

**संपर्क : ९८८१०९१९३५**

प्रा. विश्वास वसेकर
संपर्क : ९९२२५२२६६८



## करवत

लोखंडी पात्याचे एका बाजूला दातऱ्या असलेले हे साधन. हे साधन लाकूड कापण्यासाठी उपयोगी पडते. करवतीचे दोन प्रकार असतात. १) दोन्ही बाजूला मूठ असलेली, दोन माणसांनी वापरण्याची व मोठे लाकूड कापण्याची मोठी करवत २) एकाच बाजूला लाकडी मूठ असलेली एकाच माणसाला उपयोगात आणता येईल. लहान लाकूड कापण्यासाठी लहान करवत. करवतीस अरी, आरी, पनई, लहान करवत, मोठी करवत अशा नावांनी ओळखले जाते.

## कणिंग



धान्य साठवण्याचे एक साधन. हे बांबूपासून किंवा इतर झाडांच्या फोकापासून, शिंदीच्या फांद्यापासून, पलाट्यापासूनही बनवले जाते. कणिंग गोल, लांबट किंवा चौकोनी आकाराची असते. कणिंग एका मणापासून ते वीस तीस पोते धान्य मावेल एवढी असते. त्याला कणगी असेही म्हणतात. कणगीला शेणाने सारवून तिच्यात धान्य साठवले जाते.



## अडणीवरचा शंख

देवघरामध्ये शंख ठेवताना तो हलू नये किंवा पडू नये म्हणून एक लाकडाचे किंवा पितळेचे स्टँड केलेले असते, त्याला अडणी म्हणतात. त्या अडणीवर शंख ठेवला जातो. हा एक वाक्प्रचार आहे. व्यवहारात जो मूर्ख आणि अक्कलशून्य असतो तो अगदीच निरुपयोगी असतो. अडणी म्हणजे वशीला. अडणी म्हणजे वशिल्याने लागलेला किंवा टिकलेला माणूस.

## लाजाहोम



लाजा म्हणजे लाह्या. साळीच्या (भात) लाह्याचा होम म्हणून लाजाहोम. लग्नात वधूच्या ओंजळीत तिच्या भावाने किंवा इतर कुणी लाह्या घालायच्या आणि त्या तिने अग्नीत समर्पित करावयाच्या, या विधीला ‘लाजाहोम’ म्हणतात.

# प्रश्नमंजुषा

डॉ. सुधीर मोरे

१) **महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य म्हणून कोणत्या ग्रंथाचा उल्लेख केला जातो?**
अ) लीळाचरित्र आ) गाथासप्तशती
इ) भावार्थदीपिका ई) विवेकसिंधू

२) **'कानडदेशा तेलंग देशा न वचावे: महाराष्ट्री असावे' असा मराठी भाषेचा आग्रह कोणी केला?**
अ) श्री चक्रधरस्वामी आ) संत ज्ञानेश्वर
इ) संत नामदेव ई) म्हाइंभट्ट

३) **'श्री चामुण्डराये करविले, श्री गंगाराज सुत्ताले करविले' या ओळी कोणत्या शिलालेखात आढळतात?**
अ) पळसदेव आ) कुंडल
इ) श्रवणबेळगोळ ई) अक्षी

४) **'गुरुग्रंथ साहेब' या शीख धर्मग्रंथात कोणत्या मराठी संताच्या रचना समाविष्ट आहेत?**
अ) संत ज्ञानेश्वर आ) नरहरी सोनार
इ) समर्थ रामदास ई) संत नामदेव

५) **'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविती।' हा अभंग कोणाचा आहे?**
अ) संत तुकाराम आ) संत गोरा कुंभार
इ) समर्थ रामदास ई) संत ज्ञानेश्वर

६) **'वाचन प्रेरणा दिवस' दरवर्षी कोणत्या दिवशी साजरा केला जातो?**
अ) २७ फेब्रुवारी आ) १५ ऑक्टोबर
इ) २१ फेब्रुवारी ई) १ मे

७) **'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' ही भूपाळी कोणी लिहिली आहे?**
अ) राम जोशी आ) होनाजी बाळा
इ) संत एकनाथ ई) अनंत फंदी

८) **लेखनदृष्ट्या योग्य शब्द ओळखा.**
अ) दीपिका आ) दिपिका
इ) दीपीका ई) दिपीका

९) **खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यामध्ये 'झाडीपट्टी' बोलीभाषा बोलली जाते?**
अ)भंडारा आ)गोंदिया
इ) चंद्रपूर ई) वरील सर्व

१०) **'सौमित्र' हे टोपणनाव कोणत्या कवीचे आहे?**
अ) किशोर कदम आ) अरुण कोल्हटकर
इ) वर्जेश सोळंकी ई) मंगेश काळे

**संपर्क : ९४२२०००६११**

## प्रश्नमंजुषा जानेवारी २०२६ ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – अ | २ – ई | ३ – अ | ४ – इ | ५ – अ |
| ६ – इ | ७ – इ | ८ – आ | ९ – आ | १० – अ |



# सुधारक संत सेवालाल महाराज

प्रा. गजानन सोनोने

गोर बंजारा लमाण समाजात सेवालाल महाराज हे मोठे संत होऊन गेले. त्यांनी नेहमी अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा व अंधश्रद्धेविरुद्ध समाजात जाणीव जागृती निर्माण केली. ते कधीही गरीब श्रीमंत असा भेदभाव मानत नव्हते. त्यांनी आपल्या घरातून स्त्री पुरुष समानतेची सुरुवात केली होती. समाजातील जातीवाद, भोंदूगिरी, भगतभोपे, नायकशाही यांच्या विरुद्ध समाजात बंड पुकारले होते. म्हणून त्यांना 'विद्रोही संत सेवालाल' म्हटले गेले. ते सर्वांना समान मानत. जे कोणी उच्च-नीच असा भेदभाव करत त्यांना, त्यांनी आपल्या वचनाने व कवणाने सत्य सांगून मानवतेच्या मार्गाची दिशा दाखवली. बंजारा समाज

निसर्गाच्या सहवासात राहणारा असल्यामुळे सेवालाल यांनी सर्वांना पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगितले होते. ही दूरदृष्टी असणारे ते खरे समाजसुधारक होते. त्यांनी सर्व प्रथम आपल्या समाजात परिवर्तनाची सुरुवात केली होती.

संत सेवालाल यांना लहानपणी 'सेवा' म्हणत असत. याच सेवाचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आजच्या आंध्रप्रदेशातील गोलार दोडी तांडा (आताचे सेवागड), तालुका-गुंटी (गुत्त बिबल्लोरी) जिल्हा-अनंतपूर येथे झाला. त्यांच्या याडीचे (आईचे) नाव धरमणी तर वडलांचे नाव भीमा रामजी नाईक होते. सेवाला चार भाऊ होते. त्यांची नावे बदू, हापा, भाना व पूरा अशी होती. सेवा हा मोठा मुलगा होता. सेवाचे वडील 'लदेणी' चा व्यवसाय करत होते. लदेणी म्हणजे गाय, बैल यांच्या पाठीवर माल लादून भारतभर पोहचवण्याचे काम. ते सधन व श्रीमंत होते. घरी गोधन असल्यामुळे सेवा लहानपणी गुरेढोरे चारायला सवंगड्यांसोबत रानात-वनात जात असे. कारण त्या काळात बहुजनांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता त्यामुळे सेवा निरक्षर राहिला. तरी त्याच्या वडलांनी त्याला लहानपणीच लाठीकाठी, तलवार व भाल्याचे प्रशिक्षण दिले. हे सर्व प्रशिक्षण घेत सेवा लहानाचा मोठा झाला. शस्त्रकलेत निष्णात होऊन सेवा मोठा योद्धा झाला.

गोर बंजारा समाज हा संगीत प्रिय असल्यामुळे 'सेवा' लहानपणापासूनच सुमधूर बासरी वाजवण्यास स्वतःच शिकला होता. सेवा रानात गुरेढोरे चारायला घेऊन गेल्यावर जेव्हा तो बासरी वाजवी तेव्हा रानातले पशूपक्षी, गुरेढोरे व सवंगडी त्याच्या बासरीचे सूर ऐकून त्याच्या भोवती गोळा होत. हे पाहून त्याचे सवंगडी त्याला म्हणायचे ''तू आम्हांला पण बासरी वाजवायला शिकव'', तेव्हा सेवा सर्वांना म्हणाला ''मी शिकवतो पण हे शिकवल्याने येईल असे नाही तर, सर्वांनी ते मनापासून आत्मसात करावे लागते. तसेच सूर व संगीत निसर्गाच्या कणाकणात आहे त्याचा अनुभव घेऊन तुम्ही बासरी वाजवू शकता.'' रानातली ही गोष्ट त्याच्या सवंगड्यांकडून गावकऱ्यांना समजली तेव्हा त्यांना हा चमत्कार वाटला. तेव्हा गावकऱ्यांना सेवाने सांगितले की, ''मी स्वतः हे अनुभवातून शिकलो आहे.''

'सेवा' लहानपणापासूनच चिकित्सक व संशोधक वृत्तीचा होता. त्याने जंगलात पाहिले की, अनेक पशू, पक्षी जमीन खोदून काहीतरी खातात म्हणून ते निघून गेल्यावर त्याने तिथेच जमीन खोदून काढली आणि तेथे त्याला कंदमुळे, रताळे, खोडाचा भाग मिळाला. त्याने ते पदार्थ खाऊन पाहिले तर ते गोड वाटले. नंतर त्याने ते भाजून खाल्ले, तर त्याला त्यातला गोडवा शिऱ्यासारखा जाणवला. एके दिवस सवंगड्यांसोबत गुरेढोरे चारत असताना 'सेवा' सर्वांना म्हणाला, ''मी आज तुम्हांला शिरा खाऊ घालणार!'' सर्वांना आश्चर्य वाटले की जंगलात शिरा कोठून येणार! पण त्यांचा सेवावर खूप विश्वास होता. सेवाने सर्वांना लाकडे गोळा करून आग पेटविण्यास सांगितले. सेवाने जमीन खोदून मातीसारखी दिसणारी सर्व खोडे, कंदमुळे, रताळे आगीत टाकून दिले. थोड्या वेळाने थंड झाल्यावर त्यातला पांढरा गर काढून सर्वांना झाडाच्या पानावर खाण्यास दिला व म्हणाला, ''हा घ्या शिरा, खा!'' सर्वांनी तो शिरा समजून खाल्ला. सर्वांनी ही घटना आपल्या घरातील माणसांना सांगितली की, सेवाने मातीचा शिरा बनवला. सर्व जण अडाणी, भोळे, निरक्षर. त्या अशिक्षित गावकऱ्यांना ते खरे वाटले की सेवाने चमत्कार केला. घरी गेल्यावर सेवाने आईला जे खरे आहे ते सांगितले. पण ती भोळी भाबडी असल्याने गावकऱ्यांच्या बोलण्यालाच तिने खरे मानले.

अशा अनेक गोष्टींमुळे सेवावर सर्व सवंगड्यांचा मोठा विश्वास बसला. सेवा आपल्यापेक्षा वेगळा आहे. ते सर्व त्याचे भक्त झाले. 'सेवा' जे म्हणेल, सांगेल तेच सगळे खरं मानत होते. सेवाने आपल्या सर्व सवंगड्यांची परीक्षा घ्यायची ठरवली. एकदा सर्व जण

थकून जंगलात आंब्याच्या झाडाखाली बसले होते. तेव्हा सेवा सर्वांना म्हणाला, ''बघा मित्रांनो, या आंब्याच्या झाडाला चिंचा लागल्या आहे. एकाने सोडून सर्वांनी लगेच म्हटले की, ''हो झाडाला चिंचा लागल्या आहेत.'' त्यांची अशी धारणा झाली होती की, सेवा जे सांगेल तेच खरे आहे. पण एक जण म्हणाला, ''काय सेवा, खोटं बोलतो?'' आंब्याच्या झाडाला कधी चिंचा लागतील काय? असा प्रतिप्रश्नच त्याने केला. तेव्हा सेवा सर्वांना म्हणाला की, ''हाच माझा खरा मित्र, संवगडी आहे. मी म्हणतो म्हणून खरं आहे असे न मानता जे सत्य आहे ते बोलणाराच खरा जाणकार अन् मित्र असतो. मला माहीत आहे, तुम्हां सर्वांचे माझ्यावर खूप प्रेम, श्रद्धा, विश्वास असणे खूप चांगले आहे. पण मी खोटं बोलत असताना तुम्ही त्याविषयी कोणताही विचार न करता, माझ्या खोट्या बोलण्यास खरे मानून माझ्या मतासोबत सहमत होणे म्हणजे तुम्ही सर्व जण माझे मानसिक व बौद्धिक गुलाम झाले असे समजावे. ही गोष्ट माणसाला अधोगतीकडे घेऊन जाते. म्हणून आपण खऱ्याला खरे अन् खोट्याला खोटे म्हणायची हिंमत स्वतःमध्ये निर्माण केली पाहिजे. तेव्हाच आपण जीवनात स्वाभिमानाने जगू शकतो, यशस्वी होऊ शकतो.'' सेवालाल महाराज यांना हा प्रतिप्रश्न करणारा त्यांचा विश्वासू मित्र 'नाथा वढतीया' होता.

इ.स. १७ व्या शतकात दक्षिणेत निजामाचे राज्य होते. तेव्हा सेवाचा आणि निजामाचा मोठा संघर्ष झाला होता. सेवाचे सर्व विश्वासू सवंगडी बदू, हापा, उमला, नंद विसळात, खेमा, लच्छामूढ, लखू खेमावत, सोनाभंगी, केसाजंगी, भोजा जाधव, भिल्ल कारभारीण हे सेवासोबत खंबीरपणे उभे होते. सेवाने सर्वांचे नेतृत्व करत गोर-लमाण बंजारा समाज, संस्कृती व तांड्यांचे रक्षण मोठ्या हिमतीने करून अद्‌वितीय इतिहास निर्माण केला.

भारतभर व्यवसाय करताना सेवाला जे विविध धर्मांचे अनुभव आले त्यातूनच समाजाला सुधारण्याचे काम त्याने हाती घेतले. त्याच्या या कार्यामुळे संपूर्ण समाज त्याला 'सेवाभाया' असे म्हणत होता.

संत सेवालाल हे सुधारणावादी विचारांचे होते. त्यांनी गरीब-श्रीमंतातील भेदभाव मिटवण्यासाठी आपला पुतण्या जेतालाल याचा विवाह अत्यंत गरीब घराण्यातील मुलगी 'सामका' हिच्याशी लावला. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' असे एक वचन आहे. आपल्या आदर्श वागण्यातून त्यांनी समाजाला संदेश दिला. एका प्रसंगी सेवालाल म्हणाले की, ''आपण सर्वांनी पाणी जपून वापरले पाहिजे. नाहीतर एक दिवस पाणी आपल्याला विकत घ्यावे लागेल.'' त्यांचे हे बोल आज खरे ठरले आहे.

सेवालाल पर्यावरणवादी होते. त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले की, आपण भूमीशी (जमिनीशी) प्रामाणिक राहीलो पाहिजे तेव्हाच ती आपले भरणपोषण करीत राहिल हे लक्षात ठेवा. 'मई मट्‌टी सरजीत करो!' म्हणजे बंजरभूमी आपण उपजाऊ केली पाहिजे तेव्हाच शेतकरी आणि सर्व जण सुखी जीवन जगू शकतो.

संत सेवालाल म्हणायचे जे ज्ञान मी अनुभवातून शिकलो तेच तुम्हांला सांगत आहे. 'शिकच शिकावंच शिकेर राज घडावंच!' म्हणजे पहिले शिक्षण ज्ञान घ्यावे नंतर संपूर्ण समाजाला जाऊन ते सांगावे तेव्हाच आम्ही राज्य करण्यास पात्र ठरू. तसेच त्यांनी आपल्या वचनातून म्हटले की, 'आपण काळे माथेर लोक छा पगेपगर चुका करा छा!' म्हणजे आम्ही सर्व निरक्षर (लोक) माणसे असून क्षणोक्षणी चुका करीत असतो. त्या सुधारल्या पाहिजे आणि अक्षर ओळख करून घेऊन, शिक्षण घेऊन जीवन सुधारले पाहिजे.


'संत सेवालाल' यांचे हे वैज्ञानिक व परिवर्तनवादी विचार हे संपूर्ण मानवजातीला मुक्तीचा मार्ग दाखवणारे आहेत.

**संपर्क** : ९४२१७६३४५७


# नकाशातील चिन्हे

प्रा.जी.एन.हंचे

आपल्याला एखाद्या प्रदेशाची किंवा ठिकाणाची माहिती हवी असेल तर त्यासाठी आपण त्याचा नकाशा पाहतो. एखाद्या राज्याची माहिती हवी असेल तर आपण त्या देशाचा नकाशा पाहतो. एखाद्या जिल्ह्याची माहिती हवी असेल त्यासाठी त्या राज्याचा नकाशा पाहतो. एखाद्या शहराची माहिती हवी असेल तर त्यासाठी त्या जिल्ह्याचा नकाशा पाहतो. शहरातील एखाद्या स्थळाची माहिती हवी असेल तर त्या शहराचा नकाशा पाहतो व माहिती मिळवतो. आपण जो नकाशा पाहतो, तो नकाशा आपल्या वाचता यायला हवा. नकाशा वाचन ही एक कला आहे तसेच ते एक शास्त्रही आहे. आपण ज्याप्रमाणे एखादे पुस्तक वाचतो व



त्यातील मथितार्थ समजून घेतो, त्याप्रमाणे नकाशा समजून घेण्यासाठी त्यातील काही गोष्टींची माहिती हवी. एखाद्या स्थळाची माहिती हवी असते तेव्हा त्या स्थळाची चित्रमय माहिती मिळायला हवी. जेव्हा त्या स्थळाचे चित्र, जेव्हा सूची व दिशा दाखवून प्रमाणबद्ध पद्धतीने काढले जाते, त्याला नकाशा म्हणतात. तसे छोट्या परिसराच्या नकाशांपासून शहर, तालुका, जिल्हा, राज्य, देश, खंड व जग या सर्वांचे नकाशे उपलब्ध असतात. असे नकाशे कागदावर, कापडावर, भिंतीवर, प्लॅस्टीकवर छापले जातात.




असे नकाशे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त माहिती देतात, त्यासाठी विविध प्रकारची सांकेतिक चिन्हे व खुणा वापरल्या जातात. प्राकृतिक नकाशात डोंगर, पर्वत, नद्या, पठारे, मैदाने दाखवली जातात तर राजकीय नकाशात राष्ट्रीय व राज्य महामार्ग दाखवले जातात आणि पर्यटन नकाशात सहलीची ठिकाणे दाखवली जातात.

अशा प्रकारे वरील नकाशात किल्ले, डोंगर, देऊळ, नदी, पूल, लोहमार्ग, शिखर, विमानतळ, धरण, चर्च वगैरे दाखवण्यासाठी अक्षरांऐवजी संकेतचिन्हांचा वापर केला जातो. 'सर्व्हे ऑफ इंडिया' या डेहराडून येथील संस्थेने अशी चिन्हे, खुणा ठरवून दिल्या आहेत, नकाशात त्या अधिकृतपणे वापरल्या जातात. लोहमार्ग, नदी, नदीवरील पूल, नदीचा प्रवाह यांसाठी नकाशात विशिष्ट खुणा व चिन्हे दाखवली जातात.

असा चिन्हांचा उपयोग नकाशाकार यांना होतो.

राष्ट्रीय पातळीवर 'सर्व्हे ऑफ इंडिया' या संस्थेने ठरवून दिलेली चिन्हे वापरली जातात. नकाशा संग्रहात नकाशांच्या खाली एक सूची दिलेली असते. त्यात सर्व चिन्हांचा अर्थ दिलेला असतो. नकाशात (↑/उ) अशी खूण दिसते. ती दिशादर्शक खूण आहे. यातील 'उ' हे अक्षर उत्तर दिशा असे सांगते. एकदा उत्तर दिशा समजली की बाकीच्या दिशा आपोआपच समजतात.

नकाशात रंगही वापरले जातात. तपकिरी रंगाने डोंगर, पिवळ्या रंगाने पठार, तर निळ्या रंगाने नद्या, तलाव किंवा समुद्र हे दाखवले जातात.

तर नकाशाचा वापर करून तुम्ही एखाद्या ठिकाणाची माहिती मिळवण्यासाठी या चिन्हांचा जरूर उपयोग करा.

**संपर्क : ९१४५९७६५३७**

योगेश दराडे

# कुतूहल

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' जानेवारी २०२६ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ फेब्रुवारी २०२६ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई–मेल करावा.

**संपर्क : ९९२३७४०३७४**

१) **'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' केव्हा साजरा केला जातो?**
अ) १५ ते ३० जानेवारी ब) १ ते १५ फेब्रुवारी
क) १६ ते २० मार्च ड)१४ ते २८ जानेवारी

२) **'९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' कोठे पार पडले?**
अ) कोल्हापूर ब) मुंबई
क) नागपूर ड) सातारा

३) **'९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' अध्यक्ष कोण आहेत?**
अ) डॉ. रवींद्र शोभणे
ब) विश्वास पाटील.
क) डॉ. जयंत नारळीकर
ड) भारत सासणे

४) **'अग्नि योद्धा मोहीम' कशासाठी सुरू केली आहे?**
अ) ग्रामीण व निमशहरी भागात शेतीमध्ये होणारे वायू प्रदूषण कमी करण्याच्या उपायांवर जनजागृती करण्यासाठी.
ब) कारखान्यांमधील प्रदूषणाच्या नियंत्रणाकरिता
क) जंगलांमधील आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी
ड) अग्नीशमन दलाकरिता

५) **अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी कोणते निकष वापरले जातात?**
अ) प्राचीनता ब) उत्कृष्ट साहित्य
क) स्वयंभूपणा ड) वरीलपैकी सर्व

६) **२८ फेब्रुवारी हा 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' कोणता शोध लागल्यामुळे साजरा केला जातो?**
अ) अग्नीचा शोध
ब) वनस्पतींच्या उतींचा शोध
क) प्रकाश किरणविषयक रामन परिणाम
ड) विजेचा शोध

७) **'जागतिक मातृभाषा दिवस' कधी साजरा केला जातो?**
अ) २१ फेब्रुवारी ब) २१ जानेवारी
क) २१ मार्च ड) २१ मे

८) **'मराठी भाषा गौरव दिवस' कोणत्या वर्षा पासून साजरा केला जातो?**
अ) २०११ ब) २०१२
क)२०१३ ड) २०१४

९) **गाडगे महाराजांचे पूर्ण नाव काय होते?**
अ) नामदेव दामाशेट्टी रेळेकर
ब) नारायण सूर्याजी कुलकर्णी
क) निलोबा मुकुंद मकाशीर
ड) डेबुजी झिंगराजी जानोरकर

१०) **ऋतुराज म्हणजेच 'ऋतूंचा राजा' म्हणून कोणत्या ऋतूला ओळखले जाते?**
अ) शरद ऋतू ब) हेमंत ऋतू
क) वर्षा ऋतू ड) वसंत ऋतू

११) **'जागतिक मुद्रण दिवस' हा कोणाच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो?**
अ) अलेक्झांडर फ्लेमिंग
ब) अल्बर्ट आईन्स्टाईन
क) योहान्स गुटेनबर्ग
ड) राइट बंधू

**१२) महाराष्ट्रात 'हमाल पंचायत' या संघटनेची स्थापना कोणी केली?**

अ) विजय बारसे ब) गिरीश प्रभुणे

क) बाबा आढाव ड) डॉ.अभय बंग

**१३) 'जागतिक पाणथळ भूमी दिवस' कधी साजरा केला जातो?**

अ) २४ जानेवारी ब) ४ फेब्रुवारी

क) २ फेब्रुवारी ड) १ मार्च

**१४) 'जागतिक रेडिओ दिवस' केव्हा साजरा केला जातो?**

अ) २३ फेब्रुवारी ब) १३ फेब्रुवारी

क) २० मार्च ड) १ मे

**१५) पहिल्या टी-२० अंध महिला क्रिकेट विश्वचषक अंतिम स्पर्धा कोणत्या ठिकाणी भरल्या होत्या?**

अ) सिंगापूर (सिंगापूर)

ब) व्हिएन्ना (ऑस्ट्रिया)

क) कोलंबो (श्रीलंका)

ड) दिल्ली (भारत)

---

## जानेवारी २०२६ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (जानेवारी २०२६) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) १ | २) ४ | ३) ४ | ४) २ | ५) १ |
| ६) १ | ७) २ | ८) ४ | ९) ३ | १०) २ |
| ११) ४ | १२) १ | १३) ३ | १४) ३ | १५) १ |

## कुतूहल (डिसेंबर २०२५) यशस्वी स्पर्धक

**परभणी –** विराज राऊत

**कोल्हापूर –** कु. हर्षदा भोसले, कु. सारंग भाकरे, कु.अनिरुद्ध यादव, कु. श्रेया खुटाळे, कु. श्रावणी बाकरे, कु. स्वरांगी कांबळे, कु. पायल कांबळे

**सोलापूर –** कु. विराज शिंदे , **सातारा –** कु. सुवीर फडे

## चित्रकोडे (डिसेंबर) यशस्वी स्पर्धक

**कोल्हापूर –** कु. हर्षदा भोसले, कु. सारंग भाकरे, कु.अनिरुद्ध यादव, कु. श्रेया खुटाळे, कु. श्रावणी बाकरे, कु. ईरा पेटकर, कु. शांभवी कुलकर्णी, कु. अनुज पेडणेकर

**नागपूर –** कु. अवनीश जोशी

**बुलडाणा –** कु. कृतिका सुरडकर, कु. परी पारस्कार, कु.कोमल पायघन, सु. अनुष्का पहुरकर, कु.आदिती पाचपोर, कु. मुक्ताई मेटांगे, कु. कृष्णाली भिसे, कु.मानवी शिरसाट, कु. राधा पारस्कार

**अहिल्यानगर –** कु. ईश्वरी काळे, कु. कल्याणी भोकनळ

**रत्नागिरी –** कु. जुवेरीया चोगले, कु. अन्वेश जाधव, कु.अर्णव जाधव, कु. शरिफा चोगले, कु. अनिश भुवड, कु.सोहम भुवड, कु. तेजस भुवड, कु. साजरी भुवड, कु. मानस जावळे, कु.अनुष्का गमरे, कु. ईबाद चोगले

**पुणे –** कु. मुदिता गच्चे, कु. मनस्वी चौधरी, कु. सार्थक कुचिक, कु. अथर्व गाडेकर, कु. फरीन तांबोळी, कु.अवंतीका निकम, कु. मनस्वी जगदाळे, कु. अनन्या डोके, कु.श्रेया कुचिक, कु. रुद्राक्षी आवारी, कु. कार्तिक चौधरी, कु. संतोषी भोरे, कु. श्लोक शिंदे, कु. आध्याय डोंगरे, कु.स्वानंदी गायकवाड, कु. रूपेश पाचपूते, कु.रिद्धी कुचिक, कु.आरुषी वाघ, कु. सायुरी कचिक, कु. समर्थ पानमंद, कु.श्रीवेद हांडे, कु. आरोही गायकवाड

**सोलापूर –** कु. विराज शिंदे

**परभणी –** कु. प्रचिती चांडक

**सिंधुदुर्ग –** कु. आदित्य धुरी, कु. विर्तिका शेर्लेकर, कु. नंदिनी धुरी, कु. नेहा मेस्री, कु.शाल्मली नेरूरकर, कु. विराज धुरी, कु. चैताली धुरी, कु. तनिका धुरी, कु. चैतन्या रेडकर, कु.कार्तिक पाटील

**सांगली –** कु. शौर्य गुडीमल

**सातारा –** कु. सुवीर फडे

**बीड –** कु. धनश्री उकांडे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



माझी शाळा पाच वाजता सुटली आणि मी माझ्या मित्रमैत्रिणींसोबत रस्त्याने जात होते. तेवढ्यात कडेच्या एका गाडीमधल्या काकांनी गाडीचे दार उघडले आणि ते गाडीच्या बाहेर आले. त्यांनी त्याच्या खिशातून पाकिट बाहेर काढले व ते काढत असताना त्यांच्या खिशातून पैसे पडले. ते मी पाहिले. ते काका तिथून पुढे निघाले होते. तेवढ्यात मी पळत जाऊन ते पैसे उचलले आणि त्यांना मी हाक मारली. ते थांबले आणि मागे फिरले.

मी लगेच त्याच्या जवळ गेले व त्यांना म्हणाले, ''काका, हे तुमचे पैसे तिथे पडले होते.'' काकांनी माझे आभार मानले. त्यांनी माझ्या प्रामाणिकपणाबद्दल माझे, माझ्या पालकांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

**कु. ईश्वरी सुनिल जाधव**
इयत्ता – चौथी, जि.प.प्राथमिक शाळा, चाफळ (मुली),
ता. पाटण, जि. सातारा ४१५५२०



मी व माझे वडील आम्ही दोघे जण संध्याकाळच्या वेळेस गोठ्याकडे चाललो होतो. तो महिना थंडीचा होता. आम्ही दोघे जण थंडीमुळे स्वेटर घालून गेलो होतो. चालता–चालता आमचे लक्ष ऊस तोडणाऱ्या माणसांकडे गेलं. ती माणसे थंडीने काकडली होती. त्यांच्यासोबत असणारे लहान मुलांचे कपडे फाटले होते. त्यांना खूप थंडी वाजत होती. मी गोठ्यावरून घरी आले. माझे जुने कपडे व लहानपणाचे चांगले कपडे त्या मुलांना दिले. कपडे बघून त्यांना खूप आनंद झाला. त्या मुलांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्या मुलांना कपडे देताना थोडाही विचार न करता मी मनापासून त्या मुलांना माझे चांगले कपडे दिले. मी कपडे दिल्याबद्दल माझ्या आई–वडलांनी माझे कौतुक केले.

**कु. सानिका मनोज खुंटे**
इयत्ता ७वी, जि.प.प्राथमिक केंद्र शाळा, अंदोरी,
ता. खंडाळा, जि. सातारा ४१५५२१



आई आणि बाबा बाजारात गेले होते. मी आणि शेजारचा आदिराज गृहपाठवही पूर्ण करत बसलो होतो. अंगणातल्या झाडाच्या सावलीत बसून खेळायला, अभ्यास करायला आम्हां दोघांना खूप आवडायचे. आम्ही दोघेही लिहिण्यात दंग होतो. इतक्यात जोराने ओरडण्याचा आवाज आला. आम्ही दचकलो व आवाजाच्या दिशेने धावलो, पाहतो तर काय! मांजरीचे छोटेसे गोजिरवाणे पिल्लू! त्याच्या पायाला जखम झाली होती. त्या पिलाच्या पायावरून कुणाची तरी सायकल गेली असावी, असे आम्हांला वाटले. ते खूप घाबरले होते. आम्हीही घाबरून थोडे लांबच जाऊन उभे राहिलो. ते खूप ओरडू लागले. आम्ही पुन्हा त्याच्याजवळ जाऊन उभे राहिलो. ते इकडेतिकडे पाहत विचित्र आवाज काढत होते. पिलाच्या पायाजवळ थोडेसे रक्त आलेले मला दिसले. लगेच मी घरातून हळद आणली, पाणी आणले व त्याच्या जखमेवर हळद लावली. त्याला पाणी पाजले. तेवढ्यात आई-बाबा आले.

आम्ही त्यांना सर्व काही सांगितले. मांजरीचे पिल्लू घराच्या पाठीमागच्या दिशेकडे पाहत होते. ते बाबांच्या लक्षात आले. बाबांनी घराच्या मागे जाऊन शोधले. आमच्या घरामागच्या पडक्या भिंतीजवळ एक मांजर व तिची ३-४ पिले आम्हांला दिसली. ती मांजर या जखमी पिल्लाची आई असावी, असे आम्हांला वाटले. बाबांनी पिल्लाला अलगद उचलले आणि त्याच्या आईजवळ सोडले. आईला पाहताच ते पिल्लू आईला बिलगले.

**कु. स्वानंदी स्वप्नील शिंदे**

इयत्ता - ४थी, जि.प.प्राथमिक शाळा करलवस्ती (कडलास), ता. सांगोला जि. सोलापूर ४१३३०९



थंडीचे दिवस होते, मी व माझी मैत्रिण सुनीता रस्त्याने पायी जात होतो. थंडी खूप असल्याने आमच्या गावात सकाळी धुके पडते. मी व सुनीता जात होतो तेव्हा मागून एक काका दूध घेऊन घरी जात होते. ते काका फार वयस्कर दिसत होते. मागून एक सायकलवाल्याने काकांना धडक दिली. काका रस्त्यावर पडले. दगडाचा मार लागला व रक्त येण्यास सुरुवात झाली. आधी तर मी रक्त पाहून खूप घाबरून गेले. सुनीता सायकलवाल्या काकावर ओरडून भांडण करू लागली. पण मी प्रसंगवधान राखत तिला म्हटले ''आधी आपण यांना कोणाच्या तरी मदतीने डॉक्टरांकडे घेऊन जाऊ.''

आम्ही रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना आवाज दिला व एका तरुणाच्या मदतीने त्यांना डॉक्टरांकडे घेऊन गेलो. मनात विचार आला, 'आजची शाळा गेली, आई रागवेल, बाबा ओरडतील.' पण डॉक्टराने त्यांना चेक करून पट्टी बांधून दिली. डॉक्टर म्हणाले ''बरं झालं तुम्ही त्यांना लवकर दवाखान्यात आणले.'' आम्ही काकांना रिक्षाने घरी सोडून आलो.

नंतर घरी गेल्यावर आईला घडलेला पूर्ण प्रसंग सांगितला. आईला माझा फार अभिमान वाटला. बाबांनी माझी पाठ थोपटली. मलाही बरं वाटलं की, मी प्रसंगावधान राखत काकांची मदत केली.

**कु. सरला रमेश जैन**

इयत्ता - २री, सेंट ॲन्थोनी स्कुल, भुसावळ, द्वारा रमेश तेजमल जैन
१०(एस), राजेश्वर नगर, संतोषी माता हॉल जवळ, भुसावळ, जि. जळगाव ४२५२०१

# उमलती प्रतिभा

## महाराष्ट्राचा अधिपती

राजा होता माझा शिवछत्रपती
होता अखंड महाराष्ट्राचा अधिपती
जाणता राजा
लढल्या अठरा पगड जाती
अबला स्त्रिया केल्या सबला
घेतल्या हाती तलवारीच्या पाती
त्यांच्यामुळे सगळ्या महाराष्ट्राची
अभिमानाने फुगली छाती
कोथळा बाहेर काढून
केली अफजल खानाची फजिती
जिजाऊच्या पोटी जन्मला ऐसा एक छावा
आज शिवजयंती, काढा रांगोळी अन् दिवे लावा
स्वराज्यासाठी लढला, झिजला माझा शिवबा
म्हणून लोक म्हणती पोवाडे अन् गाणे गाती


**कु. सृष्टी गोवर्धन शिंदे**
इयत्ता- ६वी, जि.प.शाळा हिवरेवाडी,
ता. चांदवड, जि. नाशिक


## कार्य कसे असावे

कार्य कसे असावे..
जसे माझ्या शिवरायांचे..
येऊ दे निजाम किंवा मुगल..
तरीही मागे नाही फिरायचे..
कार्य कसे असावे..
जसे माझ्या सावित्रीचे..
कितीही शेण फेकले जरी अंगावर..
तरीही शिकवण्याचे नाही थांबायचे..
कार्य कसे असावे..
जसे संत गाडगेबाबांचे..
गावोगावी कीर्तनातून, कार्यातून..
धडे दिले स्वच्छतेचे..
कार्य कसे असावे..
जसे माझ्या जिजाऊचे..
कितीही संकटे आली तरीही..
शिवरायांना स्वप्न दिले स्वराज्याचे..


**कु. अस्मिता सचिन रांजणे**
इयत्ता-९वी, विजय मुकुंद आठवले विद्यालय
माळेगाव, ता. भोर, जि. पुणे.




कु. यशश्री विलास घुटे
इ.४ थी, श्रीकिशन सोमाणी विद्यालय, कन्हेरी रोड,
मोरेनगर, लातूर-४१३५३१



कु. रावी सोनवणे
अक्षर नंदन शाळा. इ.२ री, शिवाजी हाऊसिंग सोसायटी,
शिवाजीनगर, पुणे-४११०१६

# नदीस पत्र

प्रिय सीना नदी,

नदी तू आमच्या गावाच्या शेजारी आहे ना? त्यामुळेच तुला सीना नदी नाव पडले आहे ना? कारण माझ्या गावाचे नाव शिवणी आहे. प्रिय नदी, तुला खूप समानार्थी शब्द आहेत जसे की, सरिता, जलवाहिनी, तटिनी, निम्नगा. तू आमची माता आहे. तुझ्यामुळे आम्हां सर्व जणांना पाणी मिळते. तुझ्यामुळे आमचे जीवन आहे. तुझ्या पाण्यामुळे आमची तहान भागते. तू जर आम्हांला पाणी दिले नाही तर आम्ही तहानेने मरून जाऊ. तुझ्यामध्ये लोक गुरे धुतात, थुंकतात, तुझे पाणी घाण करतात तेव्हा तुला वाईट वाटते का गं? तू धबधब्यासारखी पडताना तुला दुखते का? नदी, तुला जेव्हा ओढे, ओहोळ, तलाव मिळतात तेव्हा तुला काय वाटते? मी तुझ्यासाठी फार काही करू शकणार नाही पण मी तुझ्यामध्ये थुंकणार नाही. तुझ्या पाण्यामुळे आम्हां शेतकऱ्यांची पिके पिकतात. आम्हांला धान्य मिळते व त्या धान्यापासून आम्ही आमची भूक भागवतो. तू काही फार मोठी नदी नाहीस पण तू खूप सुंदर आहे. तुझ्या आजूबाजूचे गवत हिरवेगार असते. कारण ते एका नदीच्या शेजारी आहे आणि तुझे पाणी त्या कोवळ्या लुसलुशीत गवतांना मिळते. नदी तू समुद्राला मिळतेस ना? तू डोंगरातून वाहतेस ना? मी तुझी नवीन मैत्रीण जान्हवी. लक्षात ठेव हं, विसरू नकोस.

तुझी प्रिय मैत्रीण,


**कु. जान्हवी प्रवीण गुंड**
इयत्ता ३री, जि.प.प्राथमिक साळा, शिवणी,
ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर ४१३२५५



**कु. श्रेयस दिलीप परसने**
इ.६ वी, आदर्श विद्यालय चिखली,
जिल्हा बुलढाणा-४४३२०१



**कु. आदिती सचिन चीजघरकर**
इ.५ वी, रायगड जिल्हा परिषद शाळा खारगाव बुद्रुक,
ता. म्हसळा, जि.रायगड-४२०१०५


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
साहेब! ते बघा... तो ट्रक येतोय गेट बंद कर सुरेश.
तितक्यात लांबून एक ट्रक येताना दिसला
जादूगार आले आणि तिघांपुढे उभे राहिले.
अहो बाजूला व्हा... तो ट्रक येतोय आम्हांला त्याची तपासणी करायची आहे.
इकडे बघा, शांत व्हा... आणि माझ्या डोळ्यांत बघा...
तुम्हांला आता काहीही दिसत नाही... त्या रस्त्यावर कुणीही नाही, तुम्हांला भास होतोय.
ट्रक चेकपोस्टवर येऊन थांबला
गेट उघडा गेट उघडा!



रस्त्यावर ट्रक नाहीच आहे, गेट बंद करा...
गेट उघडताच ट्रक पोलिसांसमोरून वेगाने निघून गेला. पण पोलिसांना कळलेसुद्धा नाही.
ट्रक दिसेनासा झाल्यावर जादूगाराने टिचकी वाजवली...
आता जागे व्हा!
अहो, बाजूला व्हा! तिकडून एक ट्रक येतोय... अरे तो ट्रक...
तो ट्रक कुठे गेला? मला तर तो इकडे येताना दिसला होता, मग गेट बंद असताना तो गेला कसा!
काम झालं असावं
हाच तो त्या गुंडांचा ट्रक असावा... पण पोलिसांना तो दिसला कसा नाही?
क्रमशः

# विरामचिन्हे

आकाश भोरडे





शब्द बोलती वाक्यांमध्ये
हाती त्यांच्या सर्व काही
चालणे–थांबणे, हावभाव ही
विरामचिन्हांनी ओळखू येई
पूर्णविरामाचा छोटा बिंदू,
वाक्याला तो पूर्ण करी
‘आई रोज स्वयंपाक करते.’
इथेच कळते गोष्ट खरी
स्वल्पविराम थांबवतो थोडं,
शब्दा–शब्दांत अंतर ठेवतो
‘आंबा, द्राक्षे, संत्री, पेरू’
अशी फळांची नावे सांगतो.
हृदयाची धडधड वाढते
जेव्हा वाक्यांत प्रश्नचिन्ह येते
‘तू अभ्यास केलास का आज?’
‘हो’ उत्तराने हास्य उमटते

उद्‌गारवाचक आश्चर्य वाटे
भावभावनांचे फुलवतो रंग
‘वा! किती सुंदर इंद्रधनू’
पाहून सगळे होती दंग
कंस आला सांगायला,
छोटा खुलासा द्यायला
‘राम (माझा मित्र) आला’
चल जाऊ खेळायला
विरामचिन्हांची गंमत मोठी
शिकूया त्यांना हळूहळू,
लिखाणालाही येतो रंग
शब्दांचा चल खेळ खेळू

संपर्क : ९१५६७१५२७५



# The Joy of Spring

**Ananya Gavali**

Grade 3A, Chatrabhuj School, Pune

Spring is lovely just like a happy dove,
"Bring it on!" said the mouse with love!

It's boring for us when it will rain,
But to the happy farmers, it brings gain!

And imagine a nation,
Without a green vacation!

Without lots of nature,
What will be our future?

Contact : 8689843444





# Why Should We Study?

Namdev Revanwar

Neil was ten years old when this incident happened. His given name was Nilesh, but everyone called him Neil because he was a huge fan of Neil Armstrong.

One day, Neil was sitting in class, paying attention to his teacher, Rajesh Sir. When Rajesh Sir asked the students about their homework from the previous day, two boys didn't raise their hands—they hadn't completed it.

"Why didn't you complete your homework?" Rajesh Sir asked. Then he added, "You must work harder. You must study more. Your parents have big expectations of you. They are working hard to educate you so they can see you earn a living."

Neil's mind stopped on these words. Questions began swirling in his head: "Should we study only because of our parents' expectations? Should we study just to make a living? Can't we make a living without education? Why should we study?"

As he was lost in thought, his friend Raju noticed him staring at the ceiling. He tapped Neil's shoulder. "What are you thinking about, Neil? You seem lost in your own world."

Neil replied, "I was wondering why we should study at all. I can't seem to find an answer."

Raju shrugged. "I guess we should study to get a job, like Rajesh Sir said."

Nitya, who had been listening, joined in. "But less-educated people make a living too. So what's the point?" Neil nodded. "I was thinking the same thing." Raju said, "My elder brother



told me that people who go to big colleges get higher salaries."

"But there must be a better reason to study," Nitya insisted. Neil thought for a moment. "Okay, let's think—what good things happen when we study?"

Raju grinned. "We sleep when we try to study!" Neil and Nitya glared at him. "Hope…less!" they said in unison. After a moment, Nitya suggested, "We learn new things when we study… though math seems useless sometimes."

Neil disagreed. "I think math is useful. Thanks to it, I can now ask for the correct change at a shop."

Raju nodded. "I agree."

"Me too," said Nitya.

Neil sighed. "This is so confusing. There are so many possibilities. What should we do?"

Nitya smiled. "Let's ask your elder brother. Raju's brother is like our teacher, and I don't have a sibling to ask." Neil grinned. "Let's go to my house after school ends." Everyone agreed, and after school, they went straight to Neil's elder brother, Abhishek. "Why do we study?" they asked him. Abhishek looked at their eager faces. Then he lowered his head and asked, "What do you think?" They answered: "Studying can lead to a good job, make our parents happy, help us learn new things, and even teach us math for daily life."

Abhishek smiled. "All of that is true. But the main reason you should study is to learn—to gain knowledge, develop skills, and allow your books to help you become a better person."

Neil asked, "Brother, what do you mean by 'allow your books to make you a better person'?"

Abhishek replied, "Books teach values and virtues, though not everyone notices them. We should. Books are not the only way to learn, but if they offer lessons in life, we must take them to heart. We must apply what we learn in our daily life and strive to behave well. Does that make sense?"


Everyone nodded, thanked him, and went to study. Abhishek smiled and returned to his own studies.

**Contact : 9763684053**

# Funny Puzzle


Ghanshyam Deshmukh

**Match the pairs.** example : Bat = Ball



**Correct the picture.**
**Re-arrange the parts.**





# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ फेब्रुवारी २०२६.

३) कोड्याचे उत्तर मार्च २०२६ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.01.2026, Date of Posting - 27th & 28th January 2026 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)










**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**






लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड





किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)





**किशोर**

**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-**


**If not delivered please return to :**

संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,